
सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, ०१ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २१९ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पुर्णा नदीच्या पात्रात तीन युवकांचा बुडून मृत्यू



आफरोज पठाण | आवेज पटेल | अल्ताफ पटेल

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.३१ ऑक्टोबर - पुर्णा नदीच्या पात्रात पोहताना दि.३० बुधवार रोजी तिन युवकांचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. आवेज नवीद पटेल (वय २१), अफरोज शिराज पठाण (वय २३), अल्ताफ राजु पटेल (वय १९) सर्व रा.शेलगाव ता.कन्नड असे बुडून मयत पावलेल्या युवकांची नावे आहेत.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हे तिघे युवक दररोज येथील पुर्णा नदीच्या सिंमेट बंधाऱ्याच्या आसपास पोहायला जायचे बुधवारी रोजी दुपारी सिमेंट कोल्हापूरी बंधाऱ्याच्या लगत नदीच्या प्रवाहात पोहत असतांना नदी पात्रातील साचलेल्या गाळाचा अंदाज न आल्याने ते गाळात जाउन आडकले व एकमेकांला गाळातुन बाहेर काढण्याच्या प्रयत्नात बुडून त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेनंतर संपूर्ण गावावर शोककळा पसरली होती. पोलीस व ग्रामस्थांनी मृत युवकांचे मृतदेह संध्याकाळी पाच वाजेच्या दरम्यान शवविच्छेदनासाठी चिंचोली लिंबाजी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. मात्र येथील शवविच्छेदन विभागात लाईट व एकाचवेळी तिन युवकांचे शवविच्छेदन करण्यासाठी सुविधा नसल्याने मयतांचे शवविच्छेदन गुरुवारी सकाळी सात वाजता झाले

अवेज पटेल यांच्या पश्चात आई, वडील, दोन भाऊ, अल्ताफ पटेल यांच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ, तिन बहिनी, तर अफ्रोज पठाण यांच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ, तिन बहिणी असा परीवार आहे.

शेलगाव शिवारातील पुर्णा नदी पात्रात दुपारी तिन ते चार वाजेच्या दरम्यान घटना घडल्याची माहिती येथील पोलीस पाटील सलिम नबी पटेल यांनी पिशोर पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देवून अकस्मात मृत्यूची नोंद केली असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विश्वजित फरताडे करत आहे.













सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



















































सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिल्ह्यात २०८ नामनिर्देशन पत्र दाखल, छाननी अंती १८७ अर्ज पात्र तर २१ अर्ज अपात्र

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ आक्टोबर**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये आज छाननी अंती दाखल २०८ नामनिर्देशन अर्जापैकी १८७ अर्ज पात्र ठरले आहेत. तर २१ अर्ज अपात्र ठरले आहेत.

विधानसभा मतदार संघनिहाय पात्र उमेदवारांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. ९२-वसमत विधानसभा मतदारसंघात आज ४० उमेदवारांची ६३ नामनिर्देशन पत्रे पात्र ठरली आहेत. यामध्ये बाळासाहेब नामदेव मगर (अपक्ष)-२, संभाजी सटवाजी सदावर्ते (अपक्ष), मझहर महेबूब शेख (अपक्ष), प्रभावती खंदारे (अपक्ष), अशोक संभाजी गायकवाड (अपक्ष), मुंजाजी सटवाजी बंडे (राष्ट्रीय समाज पक्ष), गुरु पारदेश्वर शिवाचार्य महाराज (जनसुराज्य शक्ती)-३, शेख फरीद उर्फ मुनीर इसाक पटेल (अपक्ष)-३, प्रिती मनोज जयस्वाल (अपक्ष) (वंचित बहुजन आघाडी)-२, नागिंदर भिमराव लांडगे (बहुजन समाज पक्ष), नाथराव तातेराव कदम (अपक्ष)-३, आलोक हनवंता इंगोले (अपक्ष), तान्हाजी गंगाराम भोसले (अपक्ष-२), मुंजाभाऊ विठ्ठलराव मगर (अपक्ष-२), श्रीनाथ सदाशिव साखरे (अपक्ष), सवंडकर नंदकुमार साहेबराव (अपक्ष)-२, गजानन भिमराव ढोबळे (अपक्ष), प्रल्हाद रामराव राखोंडे (अपक्ष), शामराव व्यंकटराव चव्हाण (अपक्ष), तनपुरे मंगेश शिवाजी (अपक्ष), अंकुश तातेराव आहेर (अपक्ष)-३, गायकवाड प्रकाश सुभाषराव (अपक्ष), संदीप रमेश कदम (अपक्ष), नंदु बापूराव घुटे (अपक्ष), ॲड. रामजी गौतम कांबळे (अपक्ष), श्रीमती उज्वलाताई विजयप्रकाश तांभाळे (अपक्ष)-२, चंद्रकांत रमाकांत नवघरे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार-१ व अपक्ष-१) -२, चापके राजू उर्फ प्रभाकर दत्तराव (अपक्ष-३), पुष्पक रमेशराव देशमुख (अपक्ष), दांडेगावकर जयप्रकाश रावसाहेब साळुंके (अपक्ष-२ व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार-२)-४, रामचंद्र नरहारी काळे (अपक्ष), मिलींद राजकुमार यंबल (अपक्ष)-२, बांगर रामप्रसाद नारायण (अपक्ष), विष्णु उत्तम जाधव (अपक्ष), रघुनाथ सुभानजी सुर्यवंशी (अपक्ष)-२, कुऱ्हे नवनाथ (अपक्ष), बाबूराव उर्फ बबन रामचंद्र दिपके (अपक्ष), मारोती रामराव क्यातमवार (अपक्ष), राजश्री नाथराव कदम (अपक्ष)-२, जगन्नाथ लिंबाजी अडकिणे (अपक्ष).

९३-कळमनुरी विधानसभा मतदारसंघात आज ३३ उमेदवारांची ५२ नामनिर्देशन पत्रे पात्र ठरली आहेत. यामध्ये अफजल शरीफ शेख (रिपब्लीकन सेना)-२, मेहराज अ. मस्तान शेख (ऑल इंडिया मजलीस ए इनक्लाब ए मिलात), बालाजी नारायण वानखेडे (अपक्ष), पठाण जुबेरखान जब्बारखान (अपक्ष),संतोष टारफे (शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे)-४, सत्तार पठाण काशिम पठाण (अपक्ष), उध्दव बाळासाहेब कदम (अपक्ष), दिलीप तातेराव मस्के (वंचित बहुजन आघाडी)-३, जबेर एजाज शेख (अपक्ष), ॲड रामराव आत्माराव जुंबडे (अपक्ष), संतुक दत्तराव कदम (अपक्ष)-३, प्रकाश विठ्ठलराव घुन्नर (अपक्ष), मुश्ताक इसाक शेख (हिंदुस्तान जनता पार्टी), अजित उत्तमराव मगर (अपक्ष)-२, रविंद्र गणपतराव थोरात (अपक्ष), शिवाजीराव बाबूराव सवंडकर (महाराष्ट्र स्वराज्य पार्टी), ॲड. मनेष मारोजी हनुमंते (अपक्ष), देवजी गंगाराम आसोले (अपक्ष), अजय भगवानराव सावंत (शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे)-२, संजय तुळशीराम लोंढे (अपक्ष) (राष्ट्रीय समाज पक्ष)-४, रफिउल्ला खाँ अफजलखाँ पठाण (अपक्ष) (जनतादल सेक्यूलर)-२, बुध्दभूषण वसंत पाईकराव (अपक्ष)-२, जयदीप साहेबराव देशमुख (अपक्ष), विजय माणिका बलखंडे (बसपा)-२,) बाजीराव बाबूराव सवंडकर (अपक्ष)-२, संतोष लक्ष्मण टार्फे (अपक्ष), शिवाजी बाबूराव संवडकर (राष्ट्रीय मराठा पार्टी) (अपक्ष)-२, संतोष लक्ष्मणराव बांगर (शिवसेना)-२, गोदावरी संतोषराव बांगर (अपक्ष), नामदेव ग्यानोजी कल्याणकर (अपक्ष), रविंद्र गणपतराव थोरात (अपक्ष), सुनिता साजन निरगुडे (अपक्ष), संतोष अंबादास टारफे (अपक्ष).

९४-हिंगोली विधानसभा मतदारसंघात आज ५५ उमेदवारांची ७२ नामनिर्देशन पत्रे पात्र ठरली आहेत. यामध्ये अब्दुल कदीर मस्तान सय्यद गोरेगावकर (अपक्ष)-३, सोपान शंकरराव पाटोडे (बसपा)-३, वैजनाथ कान्होजी पावडे (अपक्ष), प्रितम अशोक सरकटे (अपक्ष), अभिजीत दिलीप खंदारे(अपक्ष), मुतवल्ली पठाण ऐतिक खान ताहेर खान (एमडीपी), रमेश विठ्ठलराव शिंदे (अपक्ष)-३, उत्तम मारोती धाबे (अखंड हिंद पार्टी), रवि रामदास जाधव (एबीजेपी), विनायक श्रीराम भिसे (अपक्ष). रुपालीताई राजेश पाटील (शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे)-३, मोईन कयूम शेख (अपक्ष), गोविंद पांडूरंग वाव्हळ (अपक्ष), पाटील भाऊराव बाबूराव (अपक्ष), जावेद बाबू सय्यद (अपक्ष), शांताबाई सुरेश शेळके (अपक्ष), माधव बळीराम कोरडे (अपक्ष)-२, मालती माधव कोरडे (अपक्ष), सतीश रामेश्वर शिंदे (अपक्ष), सुवर्णा रमेश शिंदे (अपक्ष), गजानन काशिराव हेंबाडे (अपक्ष), विठ्ठल लिंबाजी मुटकुळे (अपक्ष), डॉ. विठ्ठल नथुजी रोडगे (अपक्ष)-३, सुधीरअप्पा वैजनाथअप्पा सराफ (अपक्ष), २५) प्रकाश दत्तराव थोरात (वंचित बहुजन आघाडी) (अपक्ष)-२, मुक्तारोद्दीन अजिजोद्दीन शेख (अपक्ष), गोविंदराव फुलाजीराव भवर (महाराष्ट्र राज्य समिती), बद्रीनाथ संभाजी घोंगडे (अपक्ष), लक्ष्मण सखारामजी पठाडे (अपक्ष), एकनाथ अर्जूनराव शिंदे (अपक्ष), माधव गंगाराम गाडे (अपक्ष), गंगाधर माधवराव सरकटे (अपक्ष), ॲड अमोल माधवराव जाधव (अपक्ष), सुरेश राजाराम शेळके (अपक्ष), श्यामराव आनंदा जगताप (अपक्ष), शेख बुऱ्हाण शेख मुन्नु प्यारेवाले (अपक्ष), प्रमोद सखारामजी कुटे (मनसे)-२, ॲड. रामराव आत्माराम जुंबडे (अपक्ष), गोविंदराव नामदेवराव घुटे (अपक्ष), बबन पांडूरंग गलांडे (अपक्ष), पंजाब नारायण हराळ (राष्ट्रीय समाज पक्ष, सुनिल दशरथ इंगोले (भिमसेना),) दीपक धनराज धुरिया (बीजेएसपी), शिवाजी लोडजी बल्लाळ (अपक्ष), साहेबराव किशनराव सिरसाठ (बसपा), अंबादास सुखाजी गाडे (अपक्ष)-२, सत्तार पठाण कासिम पठाण (अपक्ष), तान्हाजी सखारामजी मुटकुळे (बीजेपी)-४, विमलकुमार सुभाषचंद्र शर्मा (अपक्ष), शिवशंकर शेषेराव वाबळे (अपक्ष), सर्जेराव निवृत्ती खंदारे (ऑल इंडिया हिंदूस्तान काँग्रेस पार्टी), अशोक धोंडबा कांबळे (अपक्ष), आनंद राजाराम धुळे (अपक्ष), रामदास शिवराज पाटील (अपक्ष), सुनिता साजन निरगुडे (अपक्ष) यांचा समावेश असून दि ४ नोव्हेंबर उमेदवारी अर्ज धेण्याची शेवटची तारीख असून त्यानंतरच चित्र स्पष्ट होणार आहे.

## गावठी पिस्टलसह दोघे ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० आक्टोबर**

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक वसमत शहर व ग्रामीण हद्दीत गस्त करीत असतांना दोन इसमांजवळ गावठी पिस्टल असल्याची गोपनीय माहीती पथकाला मिळाली. पथकाने मिळालेल्या माहीतीची खात्री करीत श्रीकांत उर्फ टिल्ल्या बाबुराव सांडे वय २२ आणि शुभम उर्फ माधव राजू पतंगे वय २८ रा बुधवार पेठ वसमत यांना दि ३० आक्टोबर रोजी ताब्यात घेवून विचारपूस श्रीकांत सांडे याचेकडून एक गावठी पिस्टल जप्त करण्यात आले. त्याच्याकडे अधिक विचारपूस केली असता सदरची पिस्टल ही माधव पतंगे याने दिल्याचे सांगितले. त्यावरून वसमत शहर येथे गुरनं ६३२/२०२४ कलम ३, २५ भारतीय हत्यार कायदाप्रमाणे गुन्हा दाखल असून पुढील तपास सपोउपनि सोनटक्के करीत आहेत. सदरची कार्यवाही स्थागुशाचे पोउपनि कपील आगलावे, अंमलदार पांडुरंग राठोड, गजानन पोकळे, किशोर कातकडे, निरंजन नलावार, विठ्ठल काळे यांनी केली आहे.

# काँग्रेसमधील बंडखोरांची मनधरणी करण्यासाठी शिष्टमंडळ दाखल, गोरेगावकरांनी भेट नाकारली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ आक्टोबर**

हिंगोली विधानसभा मतदारसंघ उबाठा शिवसेनेला सोडण्यात आल्यामुळे काँग्रेसमधील माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, माजी नगराध्यक्ष सुधीरअप्पा सराफ, माजी जि प सदस्य शामराव जगताप यांनी बंडखोरी करीत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या नेत्यांची मनधरणी करण्यासाठी तेलंगणाचे आ. डॉ मोहन रेड्डी यांच्यासह शिष्टमंडळाने बंडखोरांची भेट घेतली आहे. परंतु माजी आ. भाऊराव पाटील यांनी शिष्टमंडळाची भेट नाकारली आहे.

हिंगोली विधानसभा मतदारसंघ हा मागील सहा ते सात टर्मपासून काँग्रेसकडे आहे. या मतदारसंघात काँग्रेस विरूध्द भाजप अशीच लढत पहायला मिळते परंतु यावेळी महाविकास आघाडीच्या वाटाघाटीत हा मतदारसंघ उबाठा शिवसेनेला सुटल्यामुळे काँग्रेसला जबर धक्का बसला आहे. जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघात एकही जागा काँग्रेसला न मिळाल्याने काँग्रेसचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यानी तीव्र संताप व्यक्त केला आहे. काँग्रेसचे माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, माजी नगराध्यक्ष सुधीर सराफ, माजी जि प सदस्य शामराव जगताप यांनी बंडखोरी करीत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. या बंडखोरांना मनवण्यासाठी काँग्रेसचे शिष्टमंडळाने नेत्यांच्या घरी जाऊन त्यांची मनधरणी करावयास सुरूवात केली आहे.



यावेळी आ. डॉ मोहन रेड्डी यांनी सांगितले की, महाविकास आघाडीच्या वाटाधाटीत ही जागा उबाठा शिवसेनेला सुटली आहे. परंतु काँग्रेस पक्ष जिल्ह्यातील काँग्रेसच्या नेत्यांचे आणि पदाधिकाऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी आम्ही आलो आहोत. महायुती सरकारला हरवण्यासाठी महाविकास आघाडी भक्कम असणे गरजेचे आहे. त्यामुळे काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार पक्ष, उबाठा शिवसेना एकत्र आलो आहोत. बंडखोरी केल्यास महायुतीला त्याचा फायदा होईल. आम्ही काँग्रेसच्या नाराज नेत्यांची समजून येत्या ४ नोव्हेंबर पर्यंत निश्चित काढू असा विश्वास व्यक्त केला आहे.

यावेळी शिष्टमंडळातील आ.डॉ प्रज्ञा सातव यांनी सांगितले की, हिंगोली लोकसभा काँग्रेसला सुटावी यासाठीही आम्ही प्रयत्न केले परंतु तीही जागा उबाठा शिवसेनेला सुटली. विधानसभा निवडणुकीत हिंगोली जिल्ह्यात तीन पैकी एकही विधानसभा मतदारसंघ काँग्रेसच्या वाट्याला आला नाही खरोखरच हिंगोली जिल्ह्यावर अन्याय झालेला आहे. आम्हाला तीनपैकी एक जागा सुटेल अशी अपेखा होती परंतु ती सुटली नाही मी काँग्रेस पक्षातील नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची नाराजी समजू शकते मात्र आघाडीत कधीकधी समझौता करावा लागतो. राज्यात अनेक ठिकाणी कुठे त्यांच्या जागा गेल्यात तर कुठे आमच्या जागा गेल्या आहेत. परंतु आम्ही सगळे काँग्रेसपक्ष म्हणून एकत्र आहोत, आम्ही महाविकास आघाडी म्हणून एकत्र आहोत आम्हाला महायुतीला हरविण्यासाठी एकत्र रहावेच लागणार आहे. त्यामुळे अपक्ष उमेदवारी भरणाऱ्या सर्व नेत्यांची आम्ही भेट घेत आहोत.

काँग्रेस हायकमांडने डॉ मोहन रेड्डी यांना याठिकाणी पाठविले आहे. आम्ही हिंगोली विधानसभेसाठी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही प्रयत्न केले परंतु पार्लिमेंटरी बोर्डाने ही जागा उबाठा शिवसेनेला सुटली. त्यामुळे आता आम्हाला आघाडीचा धर्म पाळून महाविकास आघाडीने दिलेल्या उमेदवाराच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहून ही जागा जिंकण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. यावेळी जिल्हाध्यक्ष दिलीप देसाई, बापूराव बांगर, सुधीरअप्पा सराफ, शामराव जगताप, माबुद बागवान, अनील नैनवाणी आदींसह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणुक निरीक्षकांच्या उपस्थितीत नियुक्त कर्मचाऱ्यांची सरमिसळ प्रक्रिया पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ आक्टोबर**

विधानसभा निवडणुकीकरिता जिल्ह्यातील तिन्ही विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्रावर वितरीत करावयाच्या मतदान प्रक्रियेत नियुक्त अधिकारी-कर्मचारी (पोलींग पार्टी) यांची निवडणूक निरीक्षक श्रीमती वंदना राव यांच्या उपस्थितीत सरमिसळीकरणाची प्रक्रिया पार पडली.



यावेळी निवडणूक निरीक्षक (पोलीस) डॉ. राकेशकुमार बन्सल, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी अब्दुल बारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राष्ट्रीय सूचना केंद्रात ही सरमिसळ प्रक्रिया संगणक प्रणालीद्वारे पूर्ण करण्यात आली. यातून मतदानाच्या ठिकाणी अधिकारी-कर्मचारी व तो नियुक्त होत असलेल्या मतदारसंघात जाणार, हे निश्चित करण्यात आले. यानंतर शेवटची सरमिसळीकरणाची प्रक्रिया ही मतदानाच्या आदल्या दिवशी म्हणजे १९ नोव्हेंबर २०२४ रोजी करण्यात येणार आहे. तसेच यापुढे कोणत्याही निवडणूक कामी नियुक्त कर्मचाऱ्यास निवडणूक प्रक्रियेतून वगळणे अथवा ड्युटी रद्द करण्यात येणार नसल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी सांगितले. भारत निवडणूक आयोगातर्फे विकसित संगणक प्रणालीमध्ये हिंगोली जिल्ह्यातील ९२-वसमत, ९३-कळमनुरी व ९४-हिंगोली विधानसभा मतदारसंघातील विधानसभा मतदारसंघनिहाय निवडणूक कामी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी-कर्मचारी यांना पाठविण्यात येते.

# युवा नेते शिवाजी मुटकुळे यांनी पोहरादेवी, महंत बाबुसिंग महाराज यांचे घेतले आशिर्वाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ आक्टोबर**

बंजारा समाजाची काशी पोहरादेवी येथे देवीचे दर्शन धेतल्यानंतर महंत बाबुसिंग महाराज यांचेही दर्शन युवा नेते शिवाजीराव मुटकुळे यांनी घेतले. यावेळी महंत बाबुसिंग महाराज यांनी भाजपचे उमदेवार तान्हाजीराव मुटकुळे यांना आशिर्वाद दिले असल्याचीा माहीती शिवाजीराव मुटकुळे यांनी दिली आहे.



हिंगोली विधानभा मतदार संघातून भाजपकडून तान्हाजीराव मुटकुळे हे निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. मुटकुळे यांनी उमेदवारी मिळाल्यानंतर नर्सी नामदेव, जलेश्वर मंदिर, श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती तसेच जिल्ह्यातील विविध देवस्थानाला भेटी देत दर्शन घेऊन आशिर्वाद घेतले आहेत.

पुसद तालुक्यातील बंजारा समाजाची काशी म्हणून ओळखले जाणारे पोहरादेवीच्या दर्शनासाठी त्यांचे सुपूत्र शिवाजीराव मुटकुळे, सेनगाव भाजपचे तालुकाध्यक्ष हिंमत राठौड यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते गेले होते. यावेळी पोहरादेवीचे दर्शन घेतल्यानंतर महंत बाबुसिंग महाराज यांचा आशिर्वाद घेतला. यावेळी बाबुसिंग महाराजांनीही शिवाजीराव मुटकुळे यांना आशिर्वाद दिले.

# निवडणूक भयमुक्त आणि शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांनी एकत्रित काम करा- निवडणूक निरीक्षक श्रीमती वंदना राव

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ आक्टोबर**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार हिंगोली जिल्ह्यातील ९२-वसमत, ९३-कळमनुरी व ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघातील सर्व यंत्रणा निवडणूक कामासाठी सज्ज झाली असून, हिंगोली जिल्ह्यातील तिन्ही विधानसभा मतदारसंघातील संपूर्ण यंत्रणेने चांगले नियोजन केले आहे. यापुढील काळातही निवडणूक भयमुक्त आणि शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांनी एकत्रित काम करण्याचे निर्देश निवडणूक निरीक्षक (सामान्य) श्रीमती वंदना राव यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या सभागृहात आज निवडणूक निरीक्षक (सामान्य) श्रीमती वंदना राव यांच्या अध्यक्षतेखाली हिंगोली जिल्ह्यातील तिन्ही विधानसभा मतदारसंघाच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस निवडणूक निरीक्षक डॉ.राकेशकुमार बन्सल, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, निवासी उप जिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मंजुष मुथा यावेळी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी मतदारसंघाच्या निवडणूक तयारीचे सादरीकरण केले. याशिवाय जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्यासह विभाग प्रमुखांनी सादरीकरण केले.



हिंगोली जिल्ह्यातील तिन्ही विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांना भेटी देत तपासणी केल्याचे सांगून श्रीमती वंदना राव म्हणाल्या की, येथील मतदान केंद्रांवर मतदारांना मतदानाच्या दिवशी सर्व आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात. यामध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृह, पुरेसा विद्युत पुरवठा, रॅम्प, दिव्यांगांसाठी व्हीलचेअर, त्यांना ने-आण करण्यासाठी वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देत प्रत्येक मतदान केंद्रावर मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी समाज माध्यमासह स्वीपच्या माध्यमातून जनजागृती करावी. तसेच मतदानाच्या दिवशी घरातील प्रत्येक मतदार मतदानासाठी केंद्रावर येईल, याकडे यंत्रणेने विशेष लक्ष देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

जिल्ह्यामध्ये कायदा व सुव्यवस्था परिस्थिती कठोरपणे हाताळा आणि कोणत्याही परिस्थितीत आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. यासाठी पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासनाने निवडणूक काळात संवेदनशीलतेने समन्वय ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले.

विधानसभा मतदारसंघात नेमलेल्या पथक प्रमुखांनी आचारसंहिता भंगाच्या घटनावर विशेष लक्ष द्यावे. कमी मतदान होणाऱ्या मतदान केंद्रावर विशेष लक्ष देऊन मतदारांना घराबाहेर काढण्यासाठी विशेष जनजागृती मोहिम राबवावी. जास्तीत जास्त मतदारांकडून मतदान करून मतदानाची टक्केवारी वाढवावी. मतदानासाठी आवश्यक असलेल्या १२ ओळखपत्रांबाबत विविध माध्यमातून मतदारांमध्ये जनजागृती करावी. हिंगोली जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघ ग्रामीणमध्ये येत असल्यामुळे जास्त मेहनत घेऊन सर्व मतदार याद्या, मतचिठ्ठ्यांचे वाटप वेळेत पूर्ण करा. मतदारांचे नाव, मतदान केंद्र क्रमांकांबाबत माहिती द्यावी तसेच योग्य समन्वयातून निवडणूक प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडावी, अशा सूचनाही श्रीमती राव यांनी दिल्या.

पोलीस निवडणूक निरीक्षक डॉ.राकेशकुमार बन्सल यांनी यावेळी स्ट्राँग रूमच्या सुरक्षा व्यवस्थेपासून तपासणी पथकाच्या तत्परतेबाबत आढावा घेतला. सर्व वरिष्ठ अधिकारी निवडणुकीच्या काळात कार्यरत असून, सर्वांनी या काळात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, यासाठी सर्व त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात व योग्य समन्वय राखत काम करावे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर तितक्याच जोमाने आणि अचूकपणे कार्यरत राहावे. या निवडणूक प्रक्रियेत कोणावरही कार्यवाहीची वेळ येणार नाही यासाठी निवडणुकीसाठी नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावेत. सर्वांनी चांगली तयारी केली असली तरी निवडणूक काळात निर्भय व निपक्षपणे निवडणुका होण्यासाठी काम करावे. सर्व पथक प्रमुख निवडणूक यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कार्यरत झाले असून, त्यांनी सक्रीय राहून आपले कर्तव्य पार पाडावेत. या कामात हयगय होणार नाही याची खबरदारी घ्यावी. निवडणूक काळात समाजमाध्यमांच्या माध्यमातून मतदारांमध्ये जनजागृती करणे तसेच उमेदवारांच्या समाज माध्यमांवरील पोस्ट, फोटो, व्हिडीओवर विशेष लक्ष ठेवावेत. तसेच समाज माध्यमांवर जाती-धर्मात, समाजा-समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांवर विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देश डॉ. राकेशकुमार बन्सल यांनी दिले.

यावेळी विधानसभा निवडणुकीसाठी नियुक्त निवडणूक निर्णय कक्ष, स्वीप, प्रशिक्षण व व्यवस्थापन, आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था, ईव्हीएम कक्ष, मतदान, मीडिया, माहिती व्यवस्थापन तक्रार निवारण कक्ष, सी-व्हीजील, वाहतूक व संपर्क व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था, तसेच हिंगोली जिल्ह्यातील तिन्ही विधानसभा मतदारसंघातील निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून माहिती जाणून घेतली. या बैठकीस सर्व जिल्हास्तरीय पथक प्रमुख, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सर्व कार्यालय प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अग्रलेख...

# दीपावलीचे मंगलपर्व

भारतीय संस्कृतीत सणांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारतातील प्रत्येक प्रांतात निरनिराळे उत्सव गुण्यागोविंदाने साजरे केले जातात. सण, उत्सवांच्या निमित्ताने परंपरा आणि संस्कृतीची जोपासना केली जाते. भारतीय सण निसर्गपूजक तर आहेतच; पण याद्वारे प्राणिमात्रांचीही पूजा करून निसर्गचक्रातील त्यांच्या अस्तित्वाच्या गरजेवर शिक्कामोर्तब केले जाते. नव्या पिढीपर्यंत आपली संस्कृती आणि तिच्यातील वसुधैव कुटुंबकम्‌चा भाव पोहोचविण्याचे कामही आपले सण-महोत्सव करतात. भारतात सर्वदूर साजरा केला जाणारा सण म्हणजे दीपावली. हा शब्द मूळ संस्कृत भाषेतून आला आहे. दीप म्हणजे दिवे आणि आवली म्हणजे रांग अर्थात दिव्यांची रांग म्हणजेच दीपावली. हीच दिवाळी सर्व राज्यांत आणि केंद्रशासित प्रदेशात मोठ्या प्रमाणात साजरी होते. आज तर दीपावलीची ही संस्कृती सातासमुद्रापार पोहोचली आहे. दीपावलीनिमित्त बाजारपेठांमध्ये ग्राहकांची गर्दी असते. हा एकच सण इतका मोठ्या प्रमाणात साजरा होतो की, उद्योग-व्यापारातील मंदी कुठल्या कुठे पळून जाते. हिंदूच नव्हे तर गैरहिंदूदेखील दीपावली सण उत्साहात साजरा करताना दिसतात. दीपावलीला घरी पणती लावलीच जाते, गोडधोड-फराळाचे जिन्नस केलेच जातात, घरापुढे रांगोळी काढलीच जाते, आकाशदिवे आणि दिव्यांच्या माळा लावल्याच जातात, फटाके फोडून आनंद द्विगुणित केला जातो आणि महालक्ष्मी पूजनासोबत सरस्वती आणि गणपतीचीही आरती केली जाते. हे सारे केल्याने लक्ष्मी प्रसन्न होते, सरस्वतीच्या आशीर्वादाने विद्येचे दान मिळते आणि गणपतीच्या वरदहस्ताने बुद्धी प्रखर होते, ही हिंदूंची मान्यता आहे. त्यामुळे दीपोत्सवात सहभागी होणाऱ्या कोणत्याही जाती-धर्माच्या, वंश-परंपरेच्या समाजाला लक्ष्मीसह बुद्धी आणि विद्येची प्राप्ती झाल्याशिवाय राहात नाही. वर्षानुवर्षांपासून दीपावलीचा हा महोत्सव भारतात आणि जिथे कुठे भारतीय समुदाय वसाहतीला आहे, तिथे उत्साहात साजरा होत आहे. या अद्‌भुत समारोहाचे कौतुकही त्या-त्या देशातील राष्ट्रप्रमुखांनी केलेले आहे. दीपावलीचा सण-समारंभ त्यांच्याही देशातील नागरिकांनी साजरा केला तर त्यांच्या देशातील नाहीशी झालेली संस्कारमूल्ये परत रुजविली जातील, अशी खात्री अनेक विदेशी समाजधुरिणांना वाटू लागली आहे. कुरीती, कुप्रथा, दुराचार, अन्याय, अज्ञान, अनीती आणि अत्याचाराचा अंधार नाहीसा करणारी दीपावली सर्वत्र बंधुभावाने साजरी होत असतानाच काही विघ्नसंतोषी या सणाच्या आनंदावर विरजण घालण्याचे प्रयत्न करताना दिसतात. काही जणांना हा सण साजरा करणे म्हणजे पैशांचा अपव्यय वाटतो तर काही जण या सणामुळे प्रदूषण वाढते, अशी टीका करतात. मात्र हा आरोप आपल्या संस्कृतीच्या वाढत्या प्रभावामुळे, मत्सरामुळे, असूयेमुळे आणि या परंपरांबद्दल हेवा निर्माण झाल्याने होत असल्याची बाब ध्यानात घेतली जायला हवी. काहींना या सणात पितृसत्तात्मकता जोपासणारी संस्कृती दिसते. त्यामुळे त्यांना हा सण साजरा करणे म्हणजे निरर्थकता आणि मागासलेपणाची लक्षणे दिसतात. पण त्यांच्या या टीकेत काहीही अर्थ नाही. आपल्या पूर्वापार चालत आलेल्या संस्कृतीने वारंवार सिंहावलोकन करून, अनिष्ट चाली-रीती बाजूला सारलेल्या आहेत. आपल्या सण-समारंभाच्या पालनात कुठेही अंधश्रद्धेला स्थान नाही, ही बाब अधोरेखित केली जायला हवी.

धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, गोवर्धन पूजा (बलिप्रतिपदा) आणि भाऊबीज अशा या पाच दिवसांच्या सणांची प्रत्येक भारतीयाला प्रतीक्षा असते. समाजातील प्रत्येक घटकाला ज्याच्या-त्याच्या इच्छेनुरूप, कामानुरूप आणि श्रमानुरूप प्राप्ती देणाऱ्या या सणावर जिहादी मानसिकतेचा प्रभाव पडत आहे. दीपावलीच्या उत्सवावर आणि हा सण साजरा करणाऱ्या सश्रद्ध समाजबांधवांवर दगडफेक करून हिंदूंची सुख-शांती भंग करण्याचे प्रयत्न वाढत आहेत. या प्रयत्नांमागे असणारी डोकी शोधून काढून, त्यांना दंडित करण्याचे काम शासन करीत असते. मात्र आपणही सजग राहून अशा प्रवृत्तींना जागीच ठेचून काढण्यासाठी राष्ट्रप्रहरी होण्याची गरज आहे. दीपावली आणि हिंदू हे जे समीकरण जगभरात पोहोचले आहे, ते मिटविण्याचे प्रयत्नसुद्धा सुरू झालेले आहेत. दीपावलीचे उर्दूकरण करून तिच्यावरील भारतीयत्वाची पकड सैल करण्याचे कारस्थान रचले जात आहे. हिंदी चित्रपटांच्या माध्यमातून तसेच जाहिरातींच्या माध्यमातून या सणाचा हिंदूंशी असलेला संबंध कसा तोडता येईल, याचे प्रयत्न सुरू आहेत. दिवाळीच्या जाहिरातींमधील अभिनेते, अभिनेत्रींचा पेहराव विशिष्ट धर्मसंप्रदायाचे महत्त्व अधोरेखित करणारा राहील, याची काळजी घेतली जात आहे. अभिनेत्रींना साडीऐवजी विशिष्ट समुदायाची ओळख प्रस्थापित होईल अशी वस्त्रप्रावरणे परिधान करण्यास बाध्य केले जात आहे. अभिनेत्रींच्या कपाळावर कुंकुमतिलक अथवा टिकली राहणार नाही, अशी कृत्येही हेतुपुरस्सर केली जात आहेत. तरुण पिढीत फटाके फोडण्याबाबत घृणा निर्माण होईल, असे संदेश प्रसारित केले जात आहेत. या सर्व बाबीतून हिंदू आणि दीपावली यांच्यातील संबंधांवर कुठाराघात घालण्याच्या कृतीचा निषेध व्हायला हवा. फटाके फोडू नका, त्यामुळे प्रदूषण होते, मुक्या जनावरांना फटाक्यांच्या आवाजाचा त्रास होतो, फटाक्यांनी हवेतील विषारी वायुघटकांमध्ये वाढ होते, त्यातून जलप्रदूषणही होते, म्हाताऱ्या लोकांना आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागते, अशी कारणेही पुढे केली जात आहेत. पण हेच प्रश्न अन्य धर्मीयांच्या सण-समारंभांच्या वेळी किंवा इंग्रजी नववर्षदिनी का उपस्थित केले जात नाहीत, ही न उमगणारी बाब आहे. तेलाचे दिवे उजळू नका, त्यामुळे लक्षावधी लिटर तेलाची नासाडी होते, हा सुद्धा एका नॅरेटिव्ह उभा करून भोळ्याभाबड्या लोकांना त्यांच्या चालीरीती कशा लोकविरोधी आणि जगाच्या कल्याणाविरुद्ध आहे, हे ठसविले जात आहे. या विरुद्ध एकीची वज्रमूठ आवळण्याची गरज आहे. हिंदू समाजात आलेल्या जागृतीमुळे यातील अनेक कुकृत्ये टळत आहेत किंवा विशिष्ट मानसिकतेचे लोक सावध होऊन आपल्या कृती हिंदूविरोधी कशा राहणार नाहीत, याची काळजी घेताना दिसू लागले आहेत.

या साऱ्या परिसंस्थेविरुद्ध आवाज उठवण्यासाठी आता जागे व्हावे लागणार आहे. आपला धर्म, त्याच्या चालीरीती टिकविण्यासाठी पावले उचलावी लागणार आहेत. दीपावली साजरी करण्यामागील संकल्पना युवा पिढीला समजावून सांगाव्या लागणार आहेत. हे सण-समारंभ साजरे केले नाहीत तर भविष्यात कोणती संकटे त्यांच्यापुढे उभी राहतील, हे समजावून सांगावे लागणार आहे. धनत्रयोदशीला धन व ऐश्वर्याची प्रतीक असलेल्या देवी लक्ष्मीचे दारात रांगोळी व पारंपरिक चिन्हांनी सुशोभित करून स्वागत केले जाते. तिचे दीर्घ प्रतीक्षेनंतरचे आगमन दर्शविण्यासाठी घरात तांदळाचे पीठ व कुंकवाने छोटी छोटी पदचिन्हे काढली जातात. नरक चतुर्दशीला भल्या पहाटे उठून सूर्योदयाअगोदरच स्नानादी कार्ये आटोपून तयार होण्याची परंपरा आहे. या सणाची एक पुरातन कथा आहे. या दिवशी असुरांचा राजा नरकासुर याचा श्रीकृष्णाने वध केल्याची कथा आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी लक्ष्मी देवी पृथ्वीतलावर भ्रमण करून भरभराट व समृद्धीच्या आशीर्वादाची लूट करते, असे मानले जाते. सायंकाळी लक्ष्मीपूजन केले जाते आणि घरी बनविलेल्या मिठाईचे सर्वांना वितरण केले जाते. याच दिवशी प्रभू रामचंद्र, सीतामाई व लक्ष्मणासोबत १४ वर्षांचा वनवास सोसून अयोध्येत घरी परतले होते. दिवाळीचा चौथा दिवस हा वर्ष प्रतिपदा म्हणून जाणला जातो. या दिवशी राजा विक्रम सिंहासनावर आरूढ झाला होता. याच दिवशी श्रीकृष्णाने इंद्र देवाच्या कोपाने झालेल्या अतिवृष्टीपासून गोकुळातल्या प्रजेचे संरक्षण करण्यासाठी गोवर्धन पर्वत उचलला होता. भाऊ व बहिणीतील अतूट प्रेमाचे प्रतीक म्हणून भाऊबीज साजरी केली जाते. भाऊ आपल्या बहिणींना त्यांच्या प्रेमाखातर सुंदरशी भेटवस्तू देतात. या साऱ्या प्रथा-परंपरांची साखरपेरणी युवा पिढीत करून, संस्कृतिसंवर्धनात त्यांचा सहभाग वाढवण्याचे प्रयत्न या दीपावलीच्या निमित्ताने व्हावेत, ही लक्ष्मीचरणी प्रार्थना!

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# नवा आयाम, आवश्यक दिशा

या भारतभूमीवर आणि हिंदू समाजावर हजारो वर्षांपासून विविध प्रकारे आक्रमणे होत आली आहेत. पण यातील अत्यंत चलाख आणि सुनियोजित आक्रमण हे साधारणपणे १५ व्या शतकात केले गेले. हे आक्रमण ख्रिश्चन चर्चद्वारा केलेले आक्रमण होय. सुरुवातीला जरी यात काहीसा विस्कळीतपणा होता तरी आज मात्र हे आक्रमण अत्यंत सुनियोजित पद्धतीने होत असलेले दिसते. अन्याय आणि अत्याचार करून राजकीय वर्चस्वाचा आधार घेत हे घडवून आणले जात होते. पण १८ व्या शतकापासून ख्रिश्चन चर्चने आपल्या कार्यपद्धतीत बदल केलेला आढळतो. सर्वसामान्य हिंदू माणूस हा धर्मांतर करण्यास तयार नसतो. तो आपल्या हिंदू धर्माचे आणि उपासना पद्धतीचे आचरण करण्यात धन्यता मानतो. याला कारण हिंदू धर्म आणि हिंदू समाजात मंदिर व्यवस्थेला असलेले स्थान आहे, हे लक्षात आल्यावर ख्रिश्चन चर्च आणि ख्रिश्चन धर्म प्रसारकांनी हिंदूंचे धर्मांतरण घडवून आणण्यासाठी वेगळी व्यूहरचना आखली. हिंदू समाजामध्ये मंदिर, मंदिराचे पुजारी, पुरोहित आणि ब्राह्मण यांचे स्थान मध्यवर्ती असून ते धर्मांतरातील सर्वात मोठा अडथळा आहे, हे ख्रिश्चन मिशनरींच्या लक्षात आले. आपण काहीही सांगितले, कितीही आमिषे दाखवली, बुद्धिभेद केला, शारीरिक अत्याचार केले तरी हे लोक एक वेळा जीव त्यागण्यास तयार असतात, पण धर्मत्याग करीत नाहीत. याला कारण प्रत्येक गावात असलेली मंदिरे, त्या मंदिरांचे पुजारी, पुरोहित आणि ब्राह्मण वर्ग आहे. बरं, इस्लाम धर्मदेखील या देशात आपण वापरीत असलेले सगळे हातखंडे अत्याचार करीतच होता; पण तो एकेश्वरवादी आणि आमचाच मार्ग खरा म्हणणारा, धर्म इथे सरसकट धर्मांतर करण्यात अपयशी ठरला आहे, हे ख्रिश्चन चर्चच्या लक्षात आले. तेव्हा यावर उपाय म्हणजे मंदिर, पुजारी, पुरोहित आणि ब्राह्मण यांची बदनामी केली पाहिजे. तरच काही प्रमाणात आपले धर्मांतराचे उद्दिष्ट साध्य करता येईल, हे लक्षात येताच हिंदू धर्मावर आणि मंदिरे व धर्म तत्त्वज्ञानाशी संबंधित अशा सगळ्या गोष्टींची बदनामी करायला ख्रिश्चन चर्चने सुरुवात केली. (संदर्भ : भारत दॅट इज इंडिया; पृष्ठ क्रमांक २७७, २७८; लेखक : जे. साई दीपक) या देशातील शिक्षणाची गुरुकुल पद्धत देशद्रोह ठरवून बंद करण्यात आली. मग मेकॉलेप्रणीत इंग्रजी शिक्षण पद्धती सुरू करण्यात आली. हिंदू धर्मातील प्रथा-परंपरा, उपासना पद्धती, व्रत-वैकल्ये हे सगळे थोतांड ठरवण्याचे प्रयत्न केले गेले. हिंदू समाजाच्या सर्वच श्रद्धा, सणवार, प्रथा हास्यास्पद ठरवण्याची जणू होड लावली गेली. या सगळ्या प्रचार, प्रभावात भारतीय सुधारणावादी चळवळीने अधिकच भर घातली. याचा परिणाम म्हणजे मंदिर आणि हिंदू धर्म विचार, हिंदू समाजानेच बहिष्कृत केल्यागत स्थिती निर्माण झाली. गावागावांतील पुजारी, पुरोहित यांचे दोन वेळचे जेवण मिळणे कठीण झाले. हिंदू समाजाने मंदिराकडे पाठ फिरवली. श्रद्धेने, सचोटीने मंदिरांमध्ये सेवा करणाऱ्या पुजारी वा पुरोहितांची टिंगलटवाळी केली जाऊ लागली. संस्कृत अध्ययन आणि अध्यापनाला वाईट दिवस आले. हिंदू समाजातील अध्ययन-अध्यापन करणाऱ्या वर्गाने संस्कृत सोडून इंग्रजी भाषा शिकायला सुरुवात केली. परिणामतः गावांमध्ये पुजारी वा पुरोहित मिळणे अवघड झाले. आजही अनेक गावांमध्ये विद्वान पुरोहित मिळत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून हिंदू समाज अश्रद्ध झाला, असे नाही. मंदिर व्यवस्थापन आणि प्रशासन या विषयाची मात्र दुरवस्था झाली. सगळ्या मंदिरांमध्ये ब्राह्मण पुजारी नसतात, याचेही भान आणि ज्ञान हिंदू समाजाला राहिले नाही. हे सगळे एका ठरावीक कारस्थानाच्या अनुषंगाने घडवून आणले जात होते. त्यात साम्यवादी विचारसरणीनेही भर घातली; तरीही एक मोठा हिंदू समाज आपल्या संस्कृतीचा, परंपरांचा, धर्म विचारांचा हिरिरीने अभ्यास करीत होता. हिंदू आध्यात्मिक विचार आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत ते जपण्याचा, त्याचे संवर्धन करण्याचा आटोकाट प्रयत्न करीतच होता. काळ बदलत राहतो. आज हिंदू समाज आणि त्यातही हिंदू तरुण अधिक डोळसपणे आपल्या धर्माकडे, संस्कृतीकडे, आम्हाला प्राप्त असलेल्या या समृद्ध वारस्याकडे पाहताना दिसतो. त्यामुळे हिंदू तीर्थक्षेत्रांवरील, मंदिरांमधील तीर्थयात्रांमधील सश्रद्धांचा ओघ वाढतोच आहे. जगभरातील सर्वसामान्य माणसाची हिंदू धर्मातील आस्था वाढताना दिसते आहे.

या पृष्ठभूमीवर विश्व हिंदू परिषदेच्या नाशिक शाखेने २० ऑक्टोबर २०२४ रोजी तपोवन परिसरातील केवडीबन येथील स्वामी नारायण मंदिर संकुलात आयोजित केलेल्या धर्माचार्य संमेलनाचे औचित्य विशेषत्वाने जाणवते. देशातील पुजारी आणि पुरोहित यांना एकत्र आणून त्यांच्याद्वारे कालसुसंगत अशी अर्चन पद्धती, सुसंगत धर्मोपचार आणि स्थानिक प्रथा-परंपरांचे जतन केले जाऊ शकते. यासाठी सर्व पुजारी वा पुरोहितांनी आपण एका धर्मविशेषत्वाचे घटक आहोत, ही जाणीव प्रथम जपली पाहिजे. हिंदू आध्यात्मिक विचारात जरी समष्टी केंद्रितता कमी असली, तरीही याच आध्यात्मिक विचारांनी निर्माण केलेली संस्कृती, परंपरा, उपासना स्वातंत्र्य आणि व्यक्ती उन्नयन या सगळ्यांचे संवर्धन व जपणूक करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. त्यामुळे निर्मोही वृत्तीने समाज आणि व्यक्तीला धार्मिक मार्गदर्शन करीत त्याच्या धर्म श्रद्धा सशक्त राहतील हे बघणे हे आपले कर्तव्य आहे, ही जाणीव अशा संमेलनांमुळे निश्चितच बळकट होईल. सदर संमेलनात महंत सुधीरदास महाराज यांनी वक्फ कायदा काय आहे? या कायद्यात १९९३ मध्ये करण्यात आलेल्या बदलांमुळे त्यातील प्रावधानांचा होत असलेला दुरुपयोग (मालमत्ता ताब्यात घेण्याची धमकी देऊन केले जाणारे धर्मांतर तसेच अवैधरीत्या ताब्यात घेतली जाणारी जमीन) आणि या कायद्यात बदल होण्याची गरज, याचे उत्तम विश्लेषण केले. वक्फ कायद्यात संशोधन करण्यासाठी बहुसंख्य असलेल्या हिंदू समाजाने कृतिशील होण्याची गरजदेखील त्यांनी अधोरेखित केली. विविध प्रतिनिधींनी सर्व ठिकाणच्या मंदिरांचे आध्यात्मिक संकुलात रूपांतर करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असे मत मांडले. मंदिर परिसरात जर गोशाळा, वेदशाळा, संस्कार वर्ग तसेच व्यायामशाळा, शक्य असेल तिथे पाठशाळा असे समाजोपयोगी व हिंदू संस्कृती संवर्धन करणाऱ्या गोष्टी उभारल्यास मंदिरांचे रूपांतर सशक्त संकुलात होऊ शकते, असेही मत मांडण्यात आले.

अर्चक आणि पुरोहित हे हिंदू समाजाच्या धार्मिक अंगाला सुदृढ करीत असतात. मात्र, या क्षेत्रातील व्यक्तींनी चारित्र्यवान, व्यासंगी, त्यागी व अधिक लोकाभिमुख होण्याची गरज आहे, हेही मुद्दे चर्चिले गेले. मंदिर स्वच्छता आणि भाविकांचे समाधान हाही एक दुर्लक्षित विषय आहे. मंदिर संकुल स्वच्छ असणे आवश्यक असते. ही स्वच्छता येणाऱ्या प्रत्येक भाविकाचे मन मोहून घेणारी बाब होय. या बाबतीत गजानन महाराज संस्थान शेगावचा आदर्श ठेवल्यास मंदिरांच्या बाबतीत सामान्य माणसाची उदासीनता बऱ्याच प्रमाणात कमी होईल तसेच मंदिर व्यवस्थापनाने व पुरोहितांनी भाविकांचे समाधान हे आपले उद्दिष्ट ठेवले पाहिजे, असे मतही व्यक्त करण्यात आले. नाशिक येथील धर्माचार्य संमेलनात २०२६ मध्ये नाशिक येथे होऊ घातलेल्या कुंभमेळ्याचे व्यवस्थापन हा विषय चर्चिला गेला. प्रशासनाला सहकार्य करीत कुंभमेळा हा हिंदू धर्माचा 'मेगा इव्हेन्ट' आपण सगळे मिळून यशस्वी करू, हा विश्वास व्यक्त करून संमेलनाचा समारोप करण्यात आला. हिंदू धर्मातील अत्यावश्यक, पण दुर्लक्षित अशा अनेक विषयांना या संमेलनाने चालना मिळाली, हे निश्चित.

९८८१२४२२२४

## वेध

**नीलेश जोशी**

# थांबा, विचार करा नंतर कृती करा

देशातील नागरिकांशी पंतप्रधान नरेंद्र मोदी 'मन की बात'च्या माध्यमातून थेट संवाद साधतात. ३ ऑक्टोबर २०१४ पासून या संवादाला सुरुवात झाली. १० वर्षांत ११४ वेळा पंतप्रधानांनी हा संवाद साधला. दैनंदिन प्रशासनिक कामकाजाबाबत नागरिकांशी अराजकीय संवाद असे याचे स्वरूप आहे. सामान्य व्यक्तीपर्यंत हा संवाद पोहोचावा या हेतूने आकाशवाणी, दूरदर्शनच्या माध्यमातून याचे प्रसारण केले जाते. देशाच्या पंतप्रधानांना देशभरातून आलेली विविध पत्रे आणि कल्पनांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलतात. १० वर्षे सातत्याने सुरू असलेल्या या कार्यक्रमातून देशाच्या हिताचे अन् जनतेच्या जिव्हाळ्याचे विविध संदेश पंतप्रधान मोदी देत असतात. अगदी पहिल्या मन की बातमध्ये त्यांनी खादीच्या कपडे खरेदीचा आग्रह, स्वच्छ भारत अभियान, मंगळ मोहिमेचे यश, कौशल्य विकास आणि दिव्यांग मुलांबाबत चर्चा केली होती. नुकतेच त्यांनी २७ ऑक्टोबर रोजीच्या प्रसारणात 'डिजिटल सुरक्षेसाठी थांबा, विचार करा नंतरच कृती करा'असे आवाहन केले. देशाच्या पंतप्रधानांना असे आवाहन करावे लागले यातूनच ही समस्या किती मोठी आहे याची कल्पना यावी.

महामार्गांवर 'नजर हटी, दुर्घटना घटी' असे फलक असतात. डिजिटल युगात सायबर फसवणूक अशाच पद्धतीने होते. सतर्कता हाच त्यावर उपाय आहे. तंत्रज्ञान प्रगती करीत असताना त्याचे काही तोटे असतात त्यातीलच हा एक प्रकार. कायद्याद्वारे या प्रकारांवर अंकुश लावण्याकरिता सायबर सेल आहे. त्या सेलच्या माध्यमातून अनेकांची फसवणूक टळली असली तरी अनेकांना गंडा बसल्याची



उदाहरणे आहेत. आता सायबर फसवणुकीतला नवा फंडा समोर आला तो 'डिजिटल अरेस्ट' नावाने. याच प्रकाराबाबत पंतप्रधान मोदींनी 'मन की बात'मध्ये भाष्य केले आहे. काय आहे हा नेमका प्रकार?, यात गुन्हेगार स्वतःला अमली पदार्थ विरोधी पथकाचा अधिकारी, पोलिस, सीबीआय, ईडी, इन्कम टॅक्स किंवा कस्टमचा अधिकारी असल्याचे सांगत पीडित व्यक्तीला फोन करतो. फोनवर त्याच्यावर किंवा त्याच्या कुटुंबीयांवर अनैतिक कामात सहभाग असल्याचा आरोप करण्यात येतो. नंतर त्याला साधा किंवा व्हिडीओ कॉल करून अटक करण्याची भीती दाखविली जाते. एवढेच नव्हे तर पीडित व्यक्तीला खोटे ओळखपत्र, कागदपत्र दाखवून त्याच्यावर कारवाई, अटक टाळण्यासाठी दंड म्हणजेच पैसे भरण्यासाठी दबाव टाकण्यात येतो. वास्तविक डिजिटल अरेस्ट नावाची कुठलीच पद्धत कायद्यात नाही. पण भयभीत करून तुमच्यावर लक्ष ठेवले जात आहे, तुम्ही अटकेत आहात असे भासविण्यात येते. यासाठी प्रामुख्याने व्यापारी, शासकीय सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांना लक्ष्य केले जाते. या प्रकारामुळे काहींचे जीवन उद्ध्वस्त झाले, तर अनेकांना मानसिक धक्क्यासोबत आर्थिक फसवणुकीला सामोरे जावे लागले.

देशात या गुन्हेगारीचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. २०२२ साली सायबर पोर्टलवर दाखल झालेल्या तक्रारींची संख्या ९ लाख ६६ हजार इतकी होती. २०२३ मध्ये या आकडेवारीत घसरण होऊन ४ लाख ५२ हजार तक्रारी नोंदविण्यात आल्या. २०२४ साली जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यांत तब्बल ७ लाख ४० हजार तक्रारी सायबर पोर्टलवर आहेत. आतापर्यंत सायबर गुन्हेगारांनी १२०.३० कोटी रुपयांची फसवणूक केल्याची नोंद पोलिसांकडे आहे. देशातील नागरिक, व्यापारी, सेवानिवृत्त कर्मचारी, अधिकारी यांनी कष्टाने मिळविलेला पैसा काही क्षणात हे सायबर चोरटे लंपास करतात. त्यापासून सामान्यजनांनी सतर्क व्हावे या हेतूने पंतप्रधानांनी लक्ष वेधले आहे. अर्थात् पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यपद्धतीनुसार त्यांनी केवळ जनतेला सतर्क केले असे होणार नाहीच. कारण कुठल्याही समस्येच्या मुळापर्यंत जाऊन तिचे निर्मूलन करणे ही त्यांची आजपर्यंतची कार्यपद्धती आहे. त्यानुसार विविध मोबाईल सेवा प्रदान करणाऱ्या कंपन्यांना देखील यावर तोडगा काढण्यासाठी पुढाकार घेण्याचे निश्चितच सांगितले गेले असेल. पण तरीही नागरिकांनी अस्तित्व नसलेल्या डिजिटल अरेस्टबाबत कुठलेही भय न बाळगता सतर्क राहणे आवश्यक तर आहेच पण पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'थांबा, विचार करा नंतर कृती करा' या संदेशाचे पालन करणे गरजेचे आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# केजरीवाल 'इंडिया'ला पाठिंबा का देत आहेत?

हरयाणा विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवाच्या धक्क्यातून दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल अजून सावरलेले दिसत नाही. हरयाणा विधानसभा निवडणुकीच्या तोंडावरच केजरीवाल यांची तिहार तुरुंगातून जामिनावर मुक्तता झाली. तुरुंगातून बाहेर येताच त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देऊन टाकला, त्यामुळे ते पूर्ण ताकदीने हरयाणा विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात उतरतील, असे वाटत होते. 'आप'ने राज्यात ९० उमेदवार उभे केले होते. हरयाणाला लागून असलेल्या दिल्ली आणि पंजाबमध्ये आपचे सरकार असल्यामुळे हरयाणात आपकडून बऱ्यापैकी कामगिरीची अपेक्षा होती. पण एक वगळता आपच्या ८९ उमेदवारांची जमानत जप्त झाली. हरयाणापेक्षा कितीतरी दूर असलेल्या जम्मू-काश्मीर विधानसभेच्या निवडणुकीत आपला एक जागा जिंकत आपले खाते उघडता आले. केजरीवाल हे तसे हरयाणाचे, म्हणजे त्यांच्या गृहराज्यातील मतदारांनीच त्यांना झटका दिला, असे म्हणायला हरकत नाही.

आपला राष्ट्रीय पक्षाची मान्यता मिळाली आहे. त्यामुळे हरयाणा आणि जम्मू-काश्मीरप्रमाणे आप महाराष्ट्र आणि झारखंडमधील विधानसभा निवडणूक लढवेल, असे वाटत होते. पण आपने या दोन राज्यांतील विधानसभा निवडणूक लढवण्यास नकार दिला. त्यामुळे या दोन राज्यांत गेल्या काही वर्षांपासून काम करणाऱ्या आपच्या स्थानिक कार्यकर्त्यांना धक्का बसणे स्वाभाविक होते. केजरीवाल या दोन राज्यांत इंडिया आघाडीचा प्रचार करतील, असे सांगण्यात आले. आप हाही काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडीचा भाग आहे. लोकसभा निवडणुकीत आपने पंजाब वगळता दिल्लीसह अन्य राज्यांत काँग्रेसशी आघाडी केली होती. पण या सर्व ठिकाणी इंडिया आघाडीचा पराभव झाला. आपने महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये इंडिया आघाडीचा प्रचार करण्याची घोषणा केली असली, तरी त्याला ते शक्य होईल का, हा खरा प्रश्न आहे. कारण पुढील वर्षी फेब्रुवारी महिन्यात दिल्ली विधानसभेची निवडणूक आहे. लोकसभा निवडणुकीत दिल्लीत आप आणि काँग्रेस यांची आघाडी झाली असली, तरी विधानसभा निवडणुकीत या दोन पक्षांची आघाडी होऊ शकत नाही. दिल्लीत हे दोन पक्ष एक-दुसऱ्याच्या विरोधात दंड थोपटून रिंगणात उतरणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये काँग्रेसचा प्रचार करणे केजरीवाल यांना शक्य होईल का? काँग्रेसला ताकद देत केजरीवाल दिल्लीत आपल्या हाताने आपल्या पायावर दगड पाडून घेतील का, हा लाखमोलाचा प्रश्न आहे.



महाराष्ट्रात केजरीवाल महाविकास आघाडीतील शिवसेना उबाठा तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार या दोन पक्षांचा प्रचार करू शकतील. कारण हे दोन्ही पक्ष दिल्ली विधानसभेची निवडणूक लढवणारे नाही. त्यामुळे या दोन पक्षांपासून केजरीवाल यांना दिल्लीत कोणताही धोका नाही. झारखंडमध्ये केजरीवाल हेमंत सोरेन यांच्या झारखंड मुक्ती मोर्चाच्या उमेदवारांचा प्रचार करू शकतील. झामुमो पण दिल्ली विधानसभेची निवडणूक लढवणार नाही. पण या दोन्ही राज्यातील काँग्रेसची स्थिती तशी नाही. या दोन्ही राज्यांत केजरीवाल यांनी काँग्रेसच्या उमेदवारांचा प्रचार केला आणि यदाकदा काँग्रेसला या दोन्ही वा यापैकी एका राज्यात यश मिळाले तर दिल्लीत काँग्रेसची ताकद वाढल्याशिवाय राहात नाही. ताकद नाही वाढली तरी काँग्रेसचा आत्मविश्वास नक्कीच वाढू शकतो; जो केजरीवाल यांना धोकादायक ठरू शकतो. यातून काही मुद्दे उपस्थित होतात. पहिला म्हणजे महाराष्ट्रात केजरीवाल यांचा प्रभाव आहे का? दुसरा, महाराष्ट्रात महाविकास आघाडीच्या नेत्यांना प्रचारात केजरीवाल यांची गरज पडेल का? तिसरा, महाविकास आघाडीचे उमेदवार आपल्या मतदारसंघात केजरीवाल यांना प्रचारासाठी बोलावतील का? आणि चौथा म्हणजे केजरीवाल यांचे ऐकून महाराष्ट्रातील मतदार महाविकास आघाडीच्या नेत्यांना मतदान करतील का? सर्वांत महत्त्वाचा आणि शेवटचा मुद्दा म्हणजे हे सर्व करून केजरीवाल यांना काय मिळणार; यातून त्यांचा राजकीय फायदा काय? दिल्लीतील बहुचर्चित उत्पादन शुल्क घोटाळ्यात केजरीवाल यांना अंमलबजावणी संचालनालयाने अटक केली होती. त्यांना जवळपास सहा महिने तुरुंगात राहावे लागले. भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या नेत्याला महाविकास आघाडीतील नेते महाराष्ट्रात प्रचारासाठी बोलावतील का, याचा अर्थ महाविकास आघाडीतील सर्व पक्षांचे नेते धुतल्या तांदळासारखे आहेत असे नाही, पण महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे नेते भ्रष्टाचाराचे प्रतीक ठरलेल्या केजरीवाल यांना प्रचारासाठी बोलावून आपल्या पायावर दगड पाडून घेतील का? केजरीवाल यांना महाराष्ट्रात प्रचारासाठी बोलावणे म्हणजे चारा घोटाळा फेम बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि राजदचे नेते लालूप्रसाद यादव यांना प्रचारासाठी बोलावण्यासारखे आहे.

झारखंडचे मुख्यमंत्री झामुमोचे हेमंत सोरेन यांना ईडीने भ्रष्टाचाराच्या आरोपातच अटक केली होती. त्यामुळे केजरीवाल यांनी झामुमोचा प्रचार करणे, त्या राज्यातील जनता खपवून घेऊ शकेल, पण महाराष्ट्रातील नाही. ही वस्तुस्थिती भारतीय महसूल सेवेचे अधिकारी असलेल्या चाणाक्ष केजरीवाल यांना माहीत नसेल, असे नाही. तरीपण ते महाराष्ट्र आणि झारखंडच्या निवडणुकीत इंडिया आघाडीचा प्रचार करण्याची गोष्ट का करतात? याचा सरळ आणि स्पष्ट अर्थ म्हणजे दिल्लीतील केजरीवाल यांचे राजकीय स्थान गेल्या काही महिन्यात डळमळीत झाले आहे. २०२५ च्या फेब्रुवारी महिन्यात होणारी दिल्ली विधानसभेची निवडणूक आपण जिंकू, याची केजरीवाल यांना खात्री उरली नाही. दुसरीकडे आपण आता एकटे भाजपाचा सामना करू शकू, असा आत्मविश्वास त्यांना राहिला नाही. त्यांना राजकीय पाठिंब्याची गरज आहे. त्यामुळे मी इंडिया आघाडीचा भाग आहे, इंडिया आघाडीतच राहणार आणि इंडिया आघाडीतील मित्रपक्षांना पाठिंबा देणार, हे केजरीवाल यांना दाखवून द्यायचे आहे. महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये इंडिया आघाडीला पाठिंबा देण्याची, आघाडीतील मित्रपक्षांचा प्रचार करण्याच्या घोषणा केजरीवाल आणि आपचे नेते करीत आहेत. केजरीवाल आणि आपचे इंडिया आघाडीवरील प्रेम हे एकतर्फी प्रेमासारखे आहे. त्याचा इंडिया आघाडीतील पक्ष जाहीरपणे स्वीकार करतील का, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. विशेष म्हणजे याच्या बदल्यात केजरीवाल यांची जी अपेक्षा आहे, त्याची परतफेड करणे इंडिया आघाडीतील पक्षांना विशेषतः काँग्रेसला शक्य होईल का? काँग्रेसला ते राजकीयदृष्ट्या फायद्याचे ठरेल का आणि दिल्ली विधानसभा निवडणुकीत आप आणि केजरीवाल यांना याचा राजकीय फायदा उचलता येईल का, असे अनेक प्रश्न यातून उपस्थित होत आहेत; ज्याची उत्तरे या दोन राज्यांतील निवडणुकीच्या निकालानंतरच मिळू शकतील.

९८८१७१७८१७

## राज्याच्या कणखर नेतृत्वासाठी शतप्रतिशत मतदान आवश्यक

संपूर्ण भारत देशात आणि राज्यात सध्या निवडणुकीचे वातावरण आहे. लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी अतिशय अल्प होती. याचे कारण लोकांमध्ये निराशा असेल किंवा सरकारप्रती किंवा राजकीय पक्षाप्रती असंतोष असू शकते. त्यात एक गोष्ट लक्षात आली, मतांची टक्केवारी ही शहरी आणि सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या भागातच कमी होती. लोकशाहीला बळकट करणारे आणि राज्याला प्रगतिपथावार नेणारे सरकार निवडण्यासाठी सर्व सुशिक्षित आणि चांगल्या वसाहतीत राहणाऱ्या लोकांनी निवडणुकीच्या दिवशी सुटी न साजरी करता बरोबर आजूबाजूच्या लोकांना मतदानाला घेऊन जाणे आणि त्यांना सहकार्य करणे अपेक्षित आहे. उलट झोपडपट्टीतील सर्वच्या सर्व लोक मतदानाला जातात व मतदान करतात. याच विषयासाठी रवींद्रनगर फ्रेंड्स वसाहतीत दिवाळी मिलन कार्यक्रम आयोजित केला गेला. प्रमुख वक्ते अजय निलदावार यांनी आजूबाजूच्या देशाची परिस्थिती तसेच महाराष्ट्रात लव्ह जिहाद, भूमी जिहादची कशी परिस्थिती उद्‌भवली व मतदान करणे किती जरूरी आहे, हे नागरिकांना समजावून सांगितले. एका एका मताची कशी गरज आहे, हे सांगितले. आपल्या एका मतामुळे आपण परिवर्तन शकतो, हे पटवून दिले. बहुसंख्येने महिला सक्रिय होत्या. हा कार्यक्रम वसाहतीतील नागरिकांनी स्वतः पुढाकार घेऊन आयोजित केला. असेच सर्व वसाहतीत जर कार्यक्रम झाले तर नक्कीच शतप्रतिशत मतदान होऊ शकेल व आपल्याला अपेक्षित सरकारची स्थापना करू शकू.

**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

●● ●●

## वाचक पत्रे

## गणित व विज्ञानाला काहीच व्हॅल्यू नको का?

पुढील शैक्षणिक वर्षापासून अभ्यासक्रम आणि परीक्षेचे स्वरूप बदलत आहे. विद्यार्थ्यांच्या गणित आणि विज्ञान विषयाची भीती कमी करण्यासाठी उत्तीर्ण होण्याची क्षमता बदलण्यात आली आहे. आता पुढील वर्षापासून गणित व विज्ञान विषयांत ३५ ऐवजी २० गुण मिळाले की विद्यार्थ्यांना उत्तीर्ण केले जाणार आहे. म्हणजे विद्यार्थ्यांना केवळ शाळेतील अंतर्गत गुणांच्या आधारे गणित व विज्ञान विषयांत उत्तीर्ण केले जाणार आहे. जर असे होणार असेल तर शिक्षण ही फार मोठी धोक्याची घंटा आहे. आरटीई ॲक्टअंतर्गत पहिली ते आठवी वर्गातील विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण न करता सर्वांना उत्तीर्ण करण्याचे धोरण आणले गेले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना नापास होण्याची भीती राहिली नाही. या कारणाने विद्यार्थी अभ्यासापासून खूप दूर गेले. शिक्षणाचा दर्जा घसरला आणि मग शासनाला जाग आली. गेल्या वर्षीपासून आठवी व पाचवी वर्गातील परीक्षा सुरू झाली आहे. या दोन वर्गांतील विद्यार्थी नापास होऊ शकतात, या भीतीपोटी किमान या दोन वर्गांतील विद्यार्थी आता अभ्यास करणारच आहेत. हे ताजे उदाहरण असताना नवीन अभ्यासक्रम अंमलबजावणीसोबत गणित व विज्ञान विषयांत उत्तीर्ण होण्याचे निकष बदलल्याने विद्यार्थी या दोन विषयांना क्षुल्लक विषय समजू शकतात आणि गणित व विज्ञान विषयाची आवड राहणार नाही. गणित हा सर्व विषयांचा राजा आहे. विज्ञान विषय आपल्या सर्वांचा आत्मा आहे. साऱ्या जगाचा डोलारा या दोन विषयांत सामावला आहे. गणित व विज्ञानाशिवाय हे जग निष्क्रिय होईल. हे दोन विषय वगळून शिकलेल्या शिक्षणाला व घेतलेल्या ज्ञानाला किती व्हॅल्यू राहील, याची कल्पना करवत नाही. शासनाने आणि अभ्यासक्रम मंडळाने दोन विषयांत उत्तीर्ण निकष बदलल्याने या दोन विषयांना कसलीच व्हॅल्यू राहणार नाही, हे लक्षात घेऊन या निर्णयाचा फेरविचार व्हावा, हीच अपेक्षा.

**बबन दामोदर गुळवे**/९५४५४४२६४८

●● ●●

## पक्ष बांधिलकी

काही पक्षांशी नाळेचे नाते जोडलेले असते. कोणी कितीही आमिषे दाखविली तरी मन धजावत नाही. लहानपणी निवडणूक म्हणजे पर्वणी वाटायची. रॅलीमध्ये मोठमोठ्याने ओरडत असे. कामवाली, मजूर वर्ग यांना आमच्या पक्षाला मत द्या म्हणून विनंती करत. अनेक निवडणुकीचे अपयश कच्चा चिवडा खाऊन पचविला आहे. केंद्रात आमचा आवडता पक्ष आहे. मनातील इच्छा पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. महाराष्ट्रात काट्याची लढत आहे. विरोधी पक्ष नको, त्या घोषणा देत आहे. आपला धर्म, संस्कृती, देवालय अबाधित ठेवायचे असेल तर हिंदुधार्जिण्या पक्षाला मत द्या. आमच्या वेळी आम्ही ज्येष्ठ नागरिकांना हाताला धरून किंवा हातात सायकल व ज्येष्ठ नागरिकांना सीटवर बसवून केंद्रापर्यंत नेत व घरी परत पोहोचण्याइतकी माणुसकी होती. आता महाराष्ट्रात निवडणूक होत आहे. एरवी न बोलणारे लोक राम राम, वाकून नमस्कार करू लागले. ८५ वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांना घरून मतदान करता येईल, परंतु फॉर्म भरण्याची ताकद नाही. तुम्ही प्रचारासाठी घरी याल, तेव्हा तुम्हीच फॉर्म भरून त्यांना ने-आणण्याची जबाबदारी घ्या. खूप लोक वृद्धाश्रमात राहतात. मतदानासाठी त्यांचा जीव तळमळतो. तेथील लोकांना मतदानासाठी घेऊन या. एक एक मत मोलाचे आहे. तुम्ही न्या, आम्ही मतदान करू. सर्वांनी मेहनत घेतली पाहिजे. पक्षकार्य निष्ठेने करा. त्याशिवाय हिंदू, हिंदुत्व, हिंदू संस्कार टिकून राहणार नाही. कुठल्याही मोहाला बळी पडून पक्ष बांधिलकी सोडू नका.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त

### डॉ. तुषार वाघमारे एम डी.एस. परीक्षा उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा**
**मंठा प्रतिनिधी :** नुकत्याच झालेल्या एम.डी.एस. मास्टर ऑफ डेंटल सर्जरी पशनेन डॉ. तुषार सोपानराव वालमारे यांनी विशेष प्राविण्यासह यश संपादन केले आहे. ही परीक्षा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशीक द्वारा आयोजित केली होती.डॉ. तुषार वाघमारे यांचे बी. डी.एस. चे शिक्षन सी. एस. एम. एस. एक, छमपती संभाजी नगर येथे पूर्ण झाले. त्यांनी शालेय व महाविद्यालयीन शिकण सुद्धा विशेष प्राविव्याने पूर्ण केले आहे, त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतूक होत आहे. त्यांनी या यशाचे श्रेय त्यांचे आई-वडीलांना व शिक्षकांना दिले.



### राष्ट्रीय ओबीसी उपाध्यक्ष बाळासाहेब दखणे यांनी दिले जिल्हाधिकारी यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**अंबड प्रतिनिधी**
दि ३० ऑगस्ट अंबड जालना- खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेच्या आधारे भरती झालेल्या शिक्षक / कर्मचाऱ्याच्या OBC, VJ- NT, SBC, SC, ST या राखीव जागेवर स्थालांतरीत केल्यामुळे रोस्टर तपासणी हि निवड सूची प्रमाणे करणे बाबत. अंबड वरील विषयास अनुसरून विनंती करण्यात येते कि, महाराष्ट्रामध्ये OBC, VJ-NT, SBC, SC, ST या प्रवर्गातील शिक्षक / कर्मचाऱ्याच्या रोस्टर तपासणी हि निवड सूची करणे गरजेचे आहे कारण खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेच्या आधारे निवड झालेल्या शिक्षक / कर्मचाऱ्याना राखीव जागेवर बेकायदेशीर रित्या स्थलांतर करण्यात आले आहे. त्यामुळे OBC, VJ-NT, SBC, SC, ST यांचे एक लाखापेक्षा जास्त नौकरीच्या जागा चुकीच्या पद्धतीने भरून खूप मोठा अन्याय केला आहे. महाराष्ट्रातील काही जिल्ह्याची परिस्थिती अभ्यासल्यानंतर सबळ पुरावे हाती आले आहे. त्यामुळे तात्काळ निवड सूची प्रमाणे रोस्टर तपासणी होणे आवश्यक आहे. योग्य पद्धतीने रोस्टर तपासणी केली तर एक ते दीड लाख नौकऱ्या OBC, VJ-NT, SBC, SC, ST या प्रवर्गासाठी उपलब्ध होतील. या विषयी आपल्या स्थरावर तत्काळ कार्यवाही करून मागासवर्गीय बांधवास न्याय देण्यात यावा. अन्यथा येणाऱ्या काळात अमर उपोषण करण्यात येईल

### परतुर विधानसभा निवडणुक ३६ उमेदवारांचे ६१दाखल अर्जापैंकी छाननीत चार उमेदवारांचे अर्ज बाद

**तभा वृत्तसेवा**
**परतुर / प्रतिनिधी**
परतुर विधानसभा मतदारसंघ होणाऱ्या निवडणुकीसाठी काल दिनांक २९ पर्यंत ३६ उमेदवारांचे ६१ अर्ज दाखल झालेले होते आज दिनांक ३० ऑक्टोबर बुधवारी सकाळी ११ वाजता झालेल्या छाननीत चार उमेदवारांचे अर्ज बाद झाल्याने आता ३२ उमेदवारांचे ५७ अर्ज शिल्लक आहेत दिनांक ४ नोव्हेंबर पर्यंत नामांकन परत घेण्याची अंतिम तारीख आहे आज सकाळी तहसील कार्यालय येथे झालेल्या छाननी प्रक्रियेत, सुरेश धुरा पवार व बालासाहेब आकात यांचे एबी फॉर्म दाखल झाल्याने नामांकन बाद् करण्यात आले तर अपक्ष शेळके यांनी शपथपत्र देताना ५०० ऐवजी १०० चा बॉण्ड पेपर वापरल्याने नामांकन बात करण्यात आला तर समी कयूम यांचे जालना मतदारसंघात मतदार यादीत नाव असल्याने व स्थानिक तहसीलदाराचे प्रमाणपत्र न आल्याने त्यांचा अर्ज बाद करण्यात आला अशा प्रकारे छाननीत आज एकूण चार उमेदवारांचे नामांकन बाद करण्यात आले यावेळी सर्वच पक्षाच्या उमेदवार व प्रतिनिधी सह अपक्ष उमेदवार छाननी प्रक्रियेस स्थान मांडून होते यावेळी राहुल भैया लोणीकर, उमेदवार सुरेशकुमार जेथलिया, मोहन अग्रवाल, एडवोकेट अंभोरे, बालासाहेब आकात, गोपालराव बोराडे आबासाहेब कदम, महेश नळगे, अजित काकडे, पांडुरंग नवल, पुरुषोत्तम वायाळ, नामदेव धुमाळ व इतरांसह उमेदवारांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लहुजी शक्ती सेनेचा खोतकरांना पाठींबा

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**
लहूजी शक्ती सेना महाराष्ट्राच्या कल्याणामाठी आणि लोकहिताच्या कार्यासाठी नेहमीच महायुती सोबत उभी राहिली आहे. महायुती सरकारने राज्याच्या प्रगतीसाठी आणि समाजातील सर्व घटकांच्या हितासाठी सातत्याने प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. याच विश्वासाने आणि एकजुटीने लहूजी शक्ती सेना जालना विधानसभा मतदारसंघ १०१ या निवडणुकीत महायुतीसोबत सक्रिय खंबीरपणे सहभागी होत आहे.मातंग समाज तसेच अनुसूचित जातींच्या जनतेच्या वतीने आम्ही घटक पक्ष या नात्याने आपल्या सोवत काम करणार आहोत. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी आपले नेतृत्व सक्षम आणि प्रेरणादायी ठरेल, आहे आम्हाला विश्वास आहे.



आपल्या विजयासाठी आम्ही लहूजी शक्ती सेनेचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते एकदिलाने जालना १०१ मतदार संघामध्ये गावा गावामध्ये मातंग वस्ती शहरांमध्ये काम करू. आपल्या निवडून आणण्यासाठी रात्र दिवस एक करू आम्ही सर्वतोपरी योगदान देऊ आणि लोकांपर्यंत महायुतीच्या कार्याची तसेच आपल्या नेतृत्वाची भावनिक नाळ जोडू.आपला विजय निश्चित होणार, यासाठी लहूजी शक्ती सेना अखेरपर्यंत कटिबद्ध राहील.




# अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयाचा खुलासा;

## फोर्टीफाईड तांदुळ आरोग्यासाठी अत्यंत लाभदायी

**तभा वृत्तसेवा जालना / प्रतिनिधी** :- सध्या स्वस्त दुकानातील तांदळात प्लॅस्टिकचे तांदुळ मिळत असल्याच्या अपप्रचार सुरु असल्याचे जिल्हा प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. मात्र रेशनिंग दुकानातुन मिळणारा तांदुळ हा फोर्टीफाईड तांदुळ आहे. केंद्र शासनाच्या अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत हा तांदुळ वितरीत केला जात असून, तो आरोग्यासाठी अपायकारक नसून अत्यंत लाभदायी आहे, असा खुलासा अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आला. अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी दिली आहे.

स्वस्त दुकानातून घरी आणलेला तांदुळ पाण्यावर तरंगत असल्याने तो प्लॅस्टिकचा आहे. अशी चर्चा ग्राहकांमध्ये सुरु आहे. ग्राहकांमध्ये असलेला हा गैरसमज दूर करण्यासाठी जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाने स्पष्टीकरण देत फोर्टीफाईड तांदळाचे महत्त्व सांगितले की, हा तांदुळ अधिक पौष्टिक असून शरिरास आवश्यक पोषण तत्वांची पुर्तता हा फोर्टीफाईड तांदुळ करतो. शरीरात पोषक तत्वांचे घटक कमी असतील तर फोर्टीफाईड तांदुळ खाल्ल्याने पोषण तत्वांची कमतरता दुर करण्यास मदत मिळेल. फोर्टीफाईड तांदळामध्ये यॅलेसेमिया, सिकलसेल, ॲनिमिया असे आजार रोखण्याचे गुणधर्म आहेत. फोर्टीफाईड तांदळामध्ये लोह, फॉलिक ॲसिड, व्हिटॅमिन बी-१२ चे सूक्ष्म अन्नद्रव्य असून आरोग्याच्या दृष्टीने उत्तम असा आहे. असेही जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती चौधर यांनी सांगितले आहे. वजनाला हलका असल्याने हा तांदुळ पाण्यावर तरंगत असतो. फोर्टीफाईड तांदळाबाबत लाभार्थ्यास शंका असल्यास त्यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयास संपर्क साधावा. फोर्टीफाईड तांदुळ हा तांदळाच्या पिठापासुन बनलेले असतात. ज्यात आरोग्यासाठी आवश्यक सुक्ष्म पोषक घटक असतात. बी-१२ सुक्ष्म अन्नद्रव्य मिश्रण केले जाते. या मिश्रणाला पुन्हा तांदळाचा आकार दिला जातो. यालाच फोर्टीफाईड तांदुळ म्हणतात. लाभार्थ्यांनी फोर्टीफाईड तांदळाबाबत होत असलेला अपप्रचार, अफवा व खोट्या बातम्यावर विश्वास ठेवू येऊ नये, असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### तरूण फाउंडेशन तर्फे रविवारी दिपावली स्नेहमिलन

**तभा वृत्तसेवा**
**जालना (प्रतिनिधी)** : येथील तरूण फाउंडेशनच्या वतीने पवित्र दिपावली निमित्त रविवारी ( ता. ०३) दुपारी १२.०० वा. सरोजिनी देवी मार्गावरील तरुण टावर येथे दिपावली स्नेहमिलन चे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शिवसेना उपनेते, माजी मंत्री अर्जुनराव खोतकर, शिवसेना ( उ. बा. ठा. ) चे जिल्हाध्यक्ष भास्करराव अंबेकर, भारतीय जनता पार्टी चे जिल्हा उपाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे, कृषीभूषण पुरस्कार प्राप्त रामदास बारगजे, रि.पा. इ चे मराठवाडा अध्यक्ष ॲड. ब्रम्हानंद चव्हाण,आम आदमी पार्टीचे शहराध्यक्ष संजोग हिवाळे, रमेश म्हस्के ( सरपंच वरूड ),राजेवाडी चे माजी सरपंच कचरूसिंग घुसिंगे, ॲड. हरिश्चंद्र चौधरी, सुखदेव बजाज. महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनील पै. खरे,सेलगाव चे माजी सरपंच अनिल अंभोरे, लक्ष्मणराव सुपारकर, नारायण आप्पा काटकर, नंदु आप्पा परळकर, बाबूराव मामा सतकर, ॲड. शिवराम सतकर, ॲड. राहुल सुपारकर, चंपालाल भगत, धनराज काबलीये, सोमेश काबलीये, नटराज चौधरी, गणेश दरक, सुभाष दरक, उमेश विजयसेनानी, ताराचंद झाडीवाले, सदानंद पवार, घनश्याम खाकीवाले, अभियंता गोपाल भुरेवाल, गणेश भुरेवाल, पारस नंद, भैय्यालाल कडपे, संतोष जांगडे आदींची उपस्थिती राहणार आहे. तरूण, नागरिकांनी मोठ्या संख्येने दिपावली स्नेहमिलनास उपस्थित रहावे असे आवाहन तरूण फाउंडेशन चे संस्थापक तरूण जांगडे यांच्यासह सदस्यांनी केले आहे.

# महामार्गावर कच्च्या तेलाचे टँकर पलटी

## तेल नेण्यासाठी परिसरातील नागरिकांची झुंबड

**तभा वृत्तसेवा / मंठा प्रतिनिधी**
जालना ते मंठा या महामार्गावर मंगळवारी रात्री अडीच वाजेच्या सुमारास कच्च्या तेलाचे टँकर पलटी झाल्याची घटना घडली आहे.यात सुदैवाने कुठलीही जीवित हानी झालेली नाही. तेलाचे टँकर पलटी झाल्याची माहिती परिसरात कळतात परिसरातील नागरिक तेल नेण्यासाठी मोठी झुंबड उडाली होती. अपघातानंतर घटनास्थळी मंठा पोलिसांनी भेट देऊन घटनेची पाहणी केली. सदर ठिकाणाहून ज्यांनी कच्चे तेल नेले आहे , ते तेल वापरा योग्य नसून त्याचे सेवन अथवा खाद्यपदार्थ बनविण्यास त्याचा उपयोग करू नये असे आवाहन तहसीलदार सोनाली जोंधळे व पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांनी आवाहन केले.



### नायगाव येथील घरा घरात भाजप नेणार- मा.सरपंच अविनाश राठोड

# “भाजप माझा - मी भाजपाचा”

**तभा वृत्तसेवा**
**तळणी / प्रतिनिधी**
तळणी.. दि.३० ऑक्टों२०२४ तालुक्यातील नायगाव मध्ये सबका साथ सबका विकास या माध्यमातून प्रत्येक घरा घरात भाजप नेणार असल्याचे एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे मा.सरपंच अविनाश राठोड यांनी केले आहे.२९ ऑक्टो २०२४ रोजी २०,००० हजार लोकांच्या साक्षीने आणि आशीर्वादाने बबनराव लोणीकर यांनी आपला नामांकन अर्ज भारतीय जनता पार्टी पक्षा कडून परतुर येथे उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे निर्वाचित अधिकाऱ्याकडे भरला आहे.बबनराव लोणीकर यांनी परतुर आणि मंठा विधानसभा क्षेत्रात केलेल्या विकासाचा लेखाजोखा गावातील त्येक कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला समजावून सांगून लोणीकरांना विजयी करण्याचे आव्हान या माध्यमातून करणार आहे. मानवता ही सर्वात मोठा धर्म आहे या मनी प्रमाणे सौभाग्यशील नेतृत्वातून लोणीकरांनी ४० ते ५० वर्ष जनतेची सेवा केली आहे.मिळालेल्या संधीतून तळागाळातील गोरगरीब,श्रमिक, दिनदुबळ्या,प्रत्येक समाजाचा,शेतकरी,युवा,महिला



युवती,नोकरदार,व्यापारी,प्रत्येकतांडा,प्रत्येक वाड्या -वस्तीचा विकास त्यांच्या कामातून आपणास दिसून येतो.त्यांनी केलेल्या विकास कामाचा काही लेखाजोखा पुढील प्रमाणे मला आवर्जून सांगावास वाटतो. वॉटर ग्रीड योजनेतून परतूर आणि मंठा तालुक्यातील प्रत्येक गावाला पिण्याच्या स्वच्छ आणि फिल्टरचे पाणी,खेड्यापासून शहराला जोडणारा शेगाव- पंढरपूर दिंडी मार्ग,रुरल बंन योजनेतून खेड्याचा विकास,नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी या योजनेतून शेतकऱ्याचा समृद्धी,महिला सक्षमीकरणासाठी लाडकी बहीण योजनेतील हजारो महिलांना लाभ,प्रधानमंत्री, रमाई,शबरी,यशवंतराव चव्हाण आणि अहिल्याबाई होळकर योजनेतून गरीब कुटुंबाला घरकुल आवास मिळवून देणे, निराधारांना पगार,अपंगांना साहित्य वाटप,गावाला डांबरीकरणाचा जोड रस्ता,अंतर्गत सिमेंट रस्ते,दोन्ही तालुक्यात अनेक ठिकाणी ३३ केवी उभारून विजेचे जाळे निर्माण करणे,प्रत्येक गावाला ग्रामपंचायत कार्यालय,प्रत्येक गावाला सभामंडप,इतर विकासाची अनेक कामे लोणीकरांकडून झालेली आहे. त्याचप्रमाणे नायगाव मध्ये झालेल्या विकास कामाची माहिती प्रत्येक व्यक्तीला घरी जाऊन सांगणार असून विकासाला मतदान करण्याचे आव्हान या माध्यमातून करणार आहे. एक स्वच्छ,प्रेरणादायी ,दूरदृष्टी आणि कार्यक्षम उमेदवार बबनराव लोणीकर यांना विक्रमी मतदान करून पुन्हा विधिमंडळात पाठवावे अशी विनंती या पत्रकाद्वारे राठोड यांनी केलेली आहे.निश्चितच मंठा आणि परतुर हे दोन तालुके स्मार्ट तालुके लोणीकर यांच्या माध्यमातून भविष्यात होतील त्याचप्रमाणे अनेक गावे स्मार्ट होतील अशी आशा या पत्रकाद्वारे राठोड यांनी शेवटी केली आहे.

# भोकरदनमध्ये ६२ उमेदवारांनी ८९ उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन / प्रतिनिधी**
जाफराबाद विधानसभा मतदारसंघातील शेवटच्या दिवसापर्यंत एकूण ६२ उमेदवारांनी ८९ उमेदवारी अर्ज सादर केले आहेत. आतापर्यंत ११२ उमेदवारांना एकूण २५० उमेदवारी अर्जांचे वाटप करण्यात आले आहे. ३० ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्जांची छाननी होणार आहे. ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारही अर्ज मागे घेऊ शकतात.मंगळवारी ४२ उमेदवारांनी ५३ अर्ज दाखल केले. गणेश रतन साबळे, (वंचित बहुजन पार्टी), नासेर दौद शेख (ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन), शेख रईस शेख बशीर शेख, प्रल्हाद केरुबा साळवे, दीपक भीमराव बोराडे (वंचित बहुजन आघाडी), रफिक अब्बास शेख, नारायण त्र्यंबक सोनी , चंद्रशेखर उत्तमराव दानवे , राजेंद्र भाऊसाहेब देशमुख , अकबली अली अक्रम अली खान , प्रकाश बन्सी पांडू ,दिगंबर बापूराव का-हाळे (भारतीय वीर किसान पार्टी), दळवी लक्ष्मणराव खंडूजी पाटील, गीता प्रमोद गावंडे, जगन तुकाराम लोखंडे, संतोष रावसाहेब दानवे (भाजप), बेबीबाई सतीश देशमुख, विकास विजय जाधव (महाराष्ट्र स्वराज्य पक्ष), शिवराय समाजवादी पार्टी (भाजप), डॉ. शेख चांद शेख (ऑल इंडिया मजलिस-ए-इंकलाब),फकीरा हरी सिरसाठ (पीपल्स पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रेटिक), गजानन सीताराम बरडे (भारतीय ट्रायबल पार्टी), महजाद इस्लाम स्वान, अंजली सांडु भुमे (ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक), राजाराम भगवान पोटे, निलेश बलीराम लाठे, सुनील लक्ष्मरणराव वाकेकर (लिबरेशन पैंथर्स पार्टी), सुनील गिनाजी इंगले (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया डे.), केशव आनंदराव जंजाल, मयूर रामेश्वर बोर्डे, आकाश प्रकाश खरात, शेख मुक्तार सत्तार बागवान (भारतीय युवा जन एकता पार्टी),जगदीश दिलीप राऊत, दीपक भीमराव बो-हाडे, सुनील नारायण गवळी, एड साहेबराव माधवराव पंडित, राजू विजय मगरे (आझाद समाज पार्टी काशिराम), दादा गोविंदराव भोंबे, मुक्तारचंद शेख, दिवाकर पुंडलिक गायकवाड, दिलीप श्रीमान राजेंद्र शेवडे, राजेंद्र शेंडे यांचा समावेश. आहे. भोकरदन विधानसभा निवडणुकीसाठी यापूर्वी सोमवारी २१ उमेदवारांनी २४ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. मात्र, ४ नोव्हेंबरला परिस्थिती स्पष्ट होईल.

भाजप महायुतीच्या वतीने संतोष दानवे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला, भाजप महाआघाडीचे अधिकृत उमेदवार संतोष रावसाहेब दानवे यांनी मंगळवारी मोठी ताकद दाखवत उमेदवारी दाखल केली. यावेळी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, शिवाजी बापू थोटे, विजय नाना परिहार, गणेश बापू फुके, भाजप जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र देशमुख, डॉ. चंद्रकांत साबळे, भाजपचे तालुका अध्यक्ष गणेश ठाले , नाना भागिले आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com





दीपोत्सवाच्या स्वागतासाठी बाजारपेठा सज्ज झाल्या आहेत.शहरातील मुख्य बाजारपेठ सुभाष रोड, भाजीमंडई, टिळक रोड, नगर नाका, मोढा रोड भागात फटाका स्टॉलच्या दुकानात नागरिकांची रेलचेल दिसून येत आहे. (छाया-श्रीकांत कुलकर्णी, बीड)

# श्री संताजी महाराजांच्या नावाने नवीन सभागृह बांधून देणार धनंजय मुंडे यांचा तेली समाजाला शब्द

## परळीची निवडणूक मी विकासाच्या मुद्द्यावर लढतोय, शनी मंदिराच्या उर्वरित बांधकामाचेही काम मीच करणार - मुंडेंचा शब्द

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३१ ऑक्टोबर**

परळी शहरांमध्ये विविध समाजातील लोक आनंदाने व एकोप्याने राहतात. विविध, सण उत्सव महापुरुषांची जयंती पुण्यतिथी यासारखे कार्यक्रम घेण्यासाठी प्रत्येक समाजाला स्वतःचे स्वतंत्र सभागृह देण्याचा मी आजवर प्रयत्न केला आहे. तेली समाजाला सुद्धा श्री संताजी महाराजांच्या नावाने सर्व सोयी युक्त असे सभागृह बांधून देणार असल्याचा शब्द धनंजय मुंडे यांनी तेली समाजाच्या सोबत आयोजित बैठकीमध्ये दिला आहे.

परळीकरांना मागील निवडणुकीत दिलेले सर्वच्या सर्व शब्द पूर्ण करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यातून अनेक विकास कामे झाली आहेत तसेच अनेक विकास कामे प्रगतीपथावर असून काही कामांना प्रशासकीय मान्यता मिळून निधी सुद्धा प्राप्त झालेला आहे. त्यामुळे कुणी कितीही आरोप करून मला एकटे पाडण्याचा किंवा घेरण्याचा प्रयत्न केला तरी मी परळीची निवडणूक ही विकासाच्या मुद्द्यावर लढत आहे, शनी मंदिराचे उर्वरित बांधकाम देखील मीच पूर्ण करणार आहे असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले.



परळी शहरात तेली समाजाच्या प्रतिनिधी व नागरिकांच्या समवेत धनंजय मुंडे यांनी स्वतंत्र बैठकीद्वारे हा संवाद साधला. यावेळी दांडिया महोत्सव व इतर सामाजिक उपक्रम आयोजित करणाऱ्या तेली समाजातील तरुणांचे धनंजय मुंडे यांनी कौतुक केले. या बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, संगमेश्वर फुटके, चंद्रकांत उदगीरकर, आयुब खान पठाण, सुरेश आण्णा टाक, चेतन सौंदळे, ड मंजीत सुगरे, कुमार व्यवहारे, दत्ताभाऊ सावंत, के डी उपाडे, प्रा. विनोद जगतकर, सूर्यकांत व्यवहारे, गुरुलिंग आप्पा पिंपळे, पांडुरंग अप्पा कोल्हे, शिवशंकर व्यवहारे, रामकीशन साखरे, तुळशीदास सालमोटे, डॉ.बावरे साहेब, पवन फुटके, प्रा.मधुकर शिंदे, अशोक बेंडे, छगन क्षीरसागर, मारुती अन्नपूर्णे, शंकर साखरे, राजाभाऊ शिंदे यांसह आदी उपस्थित होते.

# उमेदवारी माघार घेण्यासाठी स्वतः अर्ज सादर करा - गौरव इंगोले

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ ऑक्टोबर**

माजलगाव विधानसभा मतदारसंघासाठी नामनिर्दिष्ट उमेदवारांनी उमेदवारी माघार घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, तहसील कार्यालय, माजलगाव येथे सकाळी ९.४५ ते ५.४५ वाजता व दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत स्वतः हजर होऊन सादर करावेत. दिनांक ०१ नोव्हेंबर २०२४ ते ०३ नोव्हेंबर २०२४ या तिन्ही दिवशी शासकीय सुटी असल्याने कार्यालयास उमेदवारी माघार घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज सादर करता येणार नाही. तसेच दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ३ वाजेनंतर चिन्ह वाटप करण्याची सुरूवात होईल, चिन्ह वाटपाची प्रक्रिया भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसारच चिन्ह वाटप करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे माजलगाव विधानसभा मतदार संघ निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी कळवले आहे.

# लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयास नॅकचा बी दर्जा प्राप्त

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३१ ऑक्टोबर**

येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयास 'नॅक' चा 'बी ' दर्जा प्राप्त झाला आहे. महाविद्यालयाने 'नॅक'च्या मूल्यमापनात तिसऱ्यांदा हे घवघवीत यश प्राप्त केले आहे. तृतीय मूल्यमापनासाठी ' नॅक' च्या त्रिसदस्यीय समितीच्या तज्ज्ञांनी दि २२ व २३ऑक्टोबर रोजी महाविद्यालयास भेट दिली होती.

या समितीत डॉ जितेनकुमार सोनी ( माजी कुलगुरु सौराष्ट्र विद्यापीठ , गुजरात) हे समितीच्या अध्यक्षस्थानी होते तर डॉ.वासंती ताटिमाकुला (योगी वेन्नम्मा विद्यापीठ कडापा,आंध्रप्रदेश) व डॉ . पार्वती रुद्रप्पा(व्ही इ टी फर्स्ट ग्रेड कॉलेज,बेंगलोर - कर्नाटक ) यांनी सदस्या म्हणून काम पाहिले.त्यांच्या या दोन दिवसीय भेटीत त्यांच्याद्वारा महाविद्यालयातील विविध विभागांची तपासणी केली गेली.त्यात महाविद्यालयाने राबविलेले विविध उपक्रम , समाजोपयोगी घेतलेली भूमिका ,विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य,कार्यालयीन कामकाज,ग्रंथालय,प्रयोगशाळा अशा विविध विभाग कार्याचे मूल्यमापन केले.महाविद्यालयातील विविध विभाग ,विविध मंडळे-भाषावाङ्मय मंडळ, विज्ञान मंडळ, सामाजिकशास्त्रे मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, क्रीडा विभाग, परीक्षा विभाग, विद्यार्थिनी कल्याण विभाग,य.च.म.मु.विद्यापीठाचे अभ्यासकेंद्रासह महाविद्यालयात कार्यरत असलेल्या विविध क्लब कार्यांचीही त्यांनी भेट देऊन माहिती घेतली होती. याबरोबरच महाविद्यालयांमध्ये माजी विद्यार्थिनी मेळावा , पालक मेळावा घेऊन यांत पालक व माजी विद्यार्थिनींशीही या कमिटीने संवाद साधला होता. शिवाय सध्या महाविद्यालयात शिकत असणाऱ्या विद्यार्थिनींसोबत त्यांनी विविध प्रश्नांच्या माध्यमातून संवाद साधून त्यांचे मनोगत ऐकून घेतले होते. सांस्कृतिक कार्यक्रम , संशोधनपर कार्य या सर्वांची योग्य ती दखल घेऊन 'नॅक' मूल्यमापन समितीने महाविद्यालयास नॅकचा 'बी' दर्जा प्रदान केला आहे.ही महाविद्यालयाच्या उन्नतीसाठी आनंदाची बातमी आहे.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. श्यामरावजी देशमुख यांच्या स्वप्नाला मूर्त रूप देण्यासाठी महाविद्यालयाच्या माध्यमातून शैक्षणिक कामगिरी करत महाविद्यालयाने 'नॅक 'चा 'बी' दर्जा प्राप्त केल्याबद्दल संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक मा.अनिलरावजी देशमुख,संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष मा.संजयजी देशमुख , मा.सचिव रवींद्रजी देशमुख, कोषाध्यक्ष मा.प्रा. प्रसाद देशमुख,संचालिका मा.विद्याताई अनिलराव देशमुख मा.छायाताई देशमुख व इतर संचालक मंडळाने व महाविद्यालयाच्या प्राचार्या तथा संस्थेच्या संचालिका डॉ.विद्याताई देशपांडे तसेच महाविद्यालयीन अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाचे समन्वयक,डॉ.शिवनारायण वाघमारे यांच्याबरोबरच सर्व वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.यावेळी बोलताना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.विद्याताई देशपांडे यांनी या पुढेही सामाजिक कार्याबरोबरच शैक्षणिक दृष्टीने उच्चतम भूमिका पार पाडण्याचा मनोदय व्यक्त केला.

# स्वतः चे दुःख विसरून इतरांच्या सुखदुःखात सहभागी होणे हीच खरी मानवता-अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३१ ऑक्टोबर**

स्वतः चे सुख किंवा दुःख विसरून इतरांच्या सुखदुःखात सामील होणे हीच खरी मानवता असल्याची भावना स्वा रा ती रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे यांनी व्यक्त केली. ते अंबाजोगाई शहरातील प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने दिपावली निमित्त स्वा रा ती येथील रुग्णांना फराळाचे वाटप करतांना बोलत होते. स्वा रा ती येथील रुग्ण व नातेवाईक यांची दिवाळी गोड होण्यासाठी त्याना फराळाचे वाटप प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ संस्थापक राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली गोड करण्याचा प्रयत्न केला आहे. मागील ३५ वर्ष अविरतपणे प्रियदर्शनी क्रीडा मंडळ हे रुग्णसेवेची सामाजिक परंपरा जोपासण्याचे कार्य करीत आहे. हीच परंपरा पुढे जोपासत आज गुरुवार दि.३१ ऑक्टोबर रोजी स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय रूग्णालय येथील रूग्णांना राजकिशोर मोदी मित्र मंडळाच्या वतीने दिवाळी फराळ वाटप करण्यात आला.

गेल्या ३५ वर्षापासून आजपर्यंत अखंडीतपणे स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयातील रूग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना दिवाळी फराळ वाटपाची परंपरा प्रियदर्शनी क्रीडा मंडळाची आहे. आपण दीपावलीच्या सणापासून कुठेतरी दूर आहोत अशी भावना रूग्णांची व नातेवाईकांची होवू नये या सामाजिक दायित्वातून तसेच रुग्ण व नातेवाईक यांची रुग्णालयातील मानसिकतेतून त्यांना बाहेर काढून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याची परंपरा मंडळाने सुरू केली आहे. दीपावली निमित्त फराळ वाटपात गेली ३५ वर्ष सातत्य टिकवलेले आहे याबद्दल अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे यांनी प्रियदर्शनी क्रीडा मंडळाचे



संस्थापक राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. प्रियदर्शनी क्रीडा मंडळाची स्थापना यांनी १९८९ साली केली गेली. तेंव्हाच्या सर्व तरूण सहकार्यांनी मंडळामार्फत विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम, विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा मानस केला.त्याचाच एक भाग म्हणून स्वा रा ती येथील रुग्णांसाठी हा दिपावली फराळ वाटपाचा कार्यक्रम सुरू केला. ज्याचा सकारात्मक असा परिणाम रुग्ण व त्या रूग्णांचे नातेवाईक यांच्यावर दिसून आला .

राजकिशोर मोदी हे प्रियदर्शनी क्रीडा मंडळ तथा इतर संस्थांच्या माध्यमातून गेली ४० ते ४५ वर्ष सातत्याने वेगवेगळ्या घटकावर काम करत आहेत. ज्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी बालझुंबड ,महारक्तदान शिबीर, कोरोना काळात गरजूंना अन्नधान्य वाटप, कोरोना योद्धा सन्मान, निरोगी व सुदृढ आरोग्यासाठी वॉकेथॉन ही व अशी अनेक सामाजिक , शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम सातत्याने राबवित असून याकामात त्यांना सर्व सहकार्यांचे पाठबळ मिळत आहे. म्हणूनच हे उपक्रम आजतागायत अविरतपणे सुरू आहेत. दिवाळी फराळ वाटप करत असताना रूग्णांना दीपावलीच्या शुभेच्छा देऊन त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलविण्याचे काम मोदी यांचे सहकारी करत आहेत.दिपावली

### रूग्णांना दीपावली फराळ वाटप करून प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाने मागील ३५ वर्षापासूनची परंपरा जोपासली

निमित्त स्व रा ती येथे फराळ वाटपाच्या कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, डॉ.नागेश अब्दगिरे, ऍड विष्णुपंत सोळंके, मनोज लखेरा, महादेव आदमाने,अमोल लोमटे , दिनेश भराडीया, धम्मा सरवदे , चंद्रकांत गायकवाड, सुनील वाघाळकर ,माणिक वडवणकर, गणेश मसने, कचरू सारडा,बबन पानकोळी, रुपेश चव्हाण, अकबर पठाण , अशोक देवकर, काझी खयामोद्दीन , अंकुश हेडे, विजय रापतवार , राजू मोरे, सुधाकर टेकाळे, मतीनं जरगर, गोविंद पोतंगले, सुभाष पाणकोळी , अकबर पठाण, मुक्तार शेख, खलील जाफरी, सय्यद ताहेर, सचिन जाधव, शाकेर काझी, जावेद गवळी,दत्ता सरवदे, विशाल पोटभरे, सय्यद रशीद , आकाश कऱ्हाड, शुभम लखेरा, नियामत पठाण, कैलास कांबळे, सुदाम देवकर, जमादार पठाण , शाहिद शेख, महेबूब गवळी, विशाल जगताप, विश्वजित शिंदे ,जावेद इस्माईल गवळी, अजीम जरगर ,वजीर भाई, दत्ता हिरवे, शुभम लखेरा,सुशील जोशी, रोहन कुरे, आशिष ढेले, जावेद भाई, रोहित हुलगुंडे, मुन्ना वेडे, सुशील जोशी, मारुफ शेख, कपिल संकाये, रोशन लाड यांच्यासह प्रियदर्शनी क्रीडा सांस्कृतिक मंडळाचे सहकारी , राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आणि राजकिशोर मित्र मंडळाचे सर्व सहकारी सदस्य उपस्थित होते.

# ऐन दिवाळीत प्रकाश सोळंकेच्या गडाला मोहनराव जगतापांनी लावला सुरुंग

## छत्र बोरगाव,कोथरुळ येथील सोसायटी चेअरमन,माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्यांसह गावकऱ्यांचा गणेश रांजवण यांच्या पुढाकाराने जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३१ ऑक्टोबर**

ऐन दिवाळी सणात माजलगाव विधानसभेचे वातावरण चांगलेच तापले आहे.उमेदवारीवरून सुरु झालेल्या काका पुतण्यातील वादातुन कसेबसे आ.प्रकाश सोळंके सावरत असतानाच त्यांचे मुख्य विरोधक तुतारी चे उमेदवार मोहनराव जगताप यांनी त्यांच्या एका एका गडास सुरुंग लावण्यास सुरुवात केली आहे.आज बोरगाव कोथरूळ येथील सोसायटी चेअरमन सह ग्रामपंचायत सदस्यांनी मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी शरद पवार या पक्षात प्रवेश केला.



छत्र बोरगाव,कोथरुळ येथील सोसायटी चेअरमन, ग्रामपंचायत सदस्यांसह गावकऱ्यांचा जाहीर प्रवेश गणेश रांजवण यांच्या पुढाकाराने आज मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत पक्ष प्रवेश केला.

छत्र बोरगाव सेवा सह. सोसायटी चेअरमन अरुणराव जाधव,मा. उपसरपंच परमेश्वर जाधव,भागवतराव जाधव,माजी सरपंच सुदामराव कदम,लक्ष्मणराव जाधव,गणेश जाधव, प्रसाद जाधव,अक्षय जाधव,मोहन जाधव,सिद्धेश्वर जाधव, गणेश जाधव, गणेश बेद्रे, दादा तौर, कृष्णा जाधव,प्रकाश बेद्रे, अशोक घुंगासे,गोरख जाधव तसेच कोथरूळ येथील ग्रामपंचायत सदस्य शत्रुघ्न कदम,गोविंदराव कदम,मुंजाभाऊ वाघे,वसंतराव कदम यांच्यासह अनेकांनी आज मोहनराव जगताप यांच्या राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला.यावेळी राष्ट्रवादचे पदाधिकारी विश्वंभर थावरे, श्रीहरी काळे, संतोष आबा यादव,श्रीकृष्ण सोळंके,कचरू तात्या खळगे, कमलाकर कदम, कल्याण जाधव, अब्बासभाई, प्रकाश चव्हाण, सरपंच भालचंद्र सोळंके, अंगद कटके, फिरोज इनामदार, ईश्वर होके,शरद यादव यांच्यासह अनेक कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# युवक नेते अभिजीत देशमुख यांची परळी विधानसभा निवडणुकीतून माघार

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३१ ऑक्टोबर**

संबंध महाराष्ट्र राज्याचे लक्ष असलेल्या परळी विधानसभा मतदारसंघामधून मनसेने उमेदवारी जाहीर केलेले अभिजीत देशमुख यांनी माघार घेतल्याचे विठाई या आपल्या निवासस्थानी पत्रकार परिषद घेत जाहीर केले.

राज्यात निवडणुकीला रंगत आली असून उमेदवारी अर्ज दाखल करण्या च्या शेवटच्या दिवशी परळी विधानसभा मतदारसंघात मनसेला धक्का बसला आहे. परळी विधानसभा मतदारसंघातून मनसेने उमेदवारी जाहीर केलेले अभिजित देशमुख यांनी फॉर्म भरण्याआधीच माघार घेतली असून त्यांनी तशी माहिती पत्रकार परिषदेत माध्यमांना दिली आहे. माझे चुलते एन के. देशमुख यांनी परळी शहरात विकासाची बरेच कामे केली होती. त्यात नटराज रंगमंदिर, भाजी मंडई,



जिजामाता उद्यान, परळी शहरातील टॉवर असेल अशी विकासाची कामे केली. त्यानंतर गेल्या काही वर्षात परळीत विकास कामे झाल्याचे मला दिसलेले नाही. सध्याचे सुरू असलेले जाती पातीचे राजकारण मला पटत नाही. माझ्या उमेदवारीने समाजामध्ये एक वेगळाच संदेश जात असल्याचे माझ्या लक्षात आल्याने मी परळी विधानसभेच्या निवडणुकीतून माघार घेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जातीच्या नावाने मते मागणे ही गोष्ट मला पटत नाही, यामुळे मी परळी विधानसभा मतदारसंघातून माघार घेत आहे असेही ते पुढे म्हणाले.

मी शरदचंद्र पवारांचा कार्यकर्ता आहे, माझ्यासाठी ते आधारवड आहेत, माझ्या कारखान्यासाठी पवार साहेबांनी व विलासराव देशमुख साहेबांनी मला खूप मदत केली आहे. जाती पातीचे राजकारण माझ्या मनाला पटत नसल्याने माघार घेतली असल्याचे अभिजित देशमुख म्हणाले.

# परळीचा होणार का ऑटोवाला आमदार!

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३१ ऑक्टोबर**

परळी विधानसभा मतदारसंघाचे वातावरण हळूहळू तापू लागले आहे. नेहमीपेक्षा यंदाची निवडणूक ही वेगळ्या पद्धतीने होऊ घातली आहे. राजकीय पक्षांच्या फुटाफुटीला मतदार नागरिक वैतागले असून ते वेगळ्या पर्यायाचा शोध घेतला जात आहे. युवक नेते राजेभाऊ फड यांनी महाविकास आघाडीकडून उमेदवारी देण्याची मागणी केली होती. सर्व तयारी पूर्ण झालेली असतांनाही व सक्षम उमेदवार असतानाही पक्षाने त्यांना उमेदवारी न देता ऐनवेळी उमेदवार वेगळाच दिला. मात्र मतदारसंघातील जनतेत राजेभाऊ यांच्याच नावाला मोठी पसंती असल्याचे दिसून येत आहे. राजेभाऊ हे अतिशय साधारण कौटुंबिक परिस्थितीतून पुढे आलेले असून, काहीकाळ त्यांनी शहरात ऑटो चालवला आहे.



परळी विधानसभा मतदारसंघातील यंदाचे चित्र वेगळे दिसून येऊ लागले आहे. पक्षीय समीकरणे बदलली आहेत. निवडून येण्याचे गणित जरी उमेदवार लावू लागले असले तरीही मतदारसंघातील नागरिकांत सर्वसामान्यांच्या हक्काचा माणूस म्हणून राजेभाऊ फड यांच्या नावाला पसंती असल्याचे दिसून येत आहे. पक्षाने उमेदवारी डावलली असली तरी त्यांनी यंदाची विधानसभा निवडणूक लढवावी असा जनतेतून आग्रह दिसून येत आहे. राजेभाऊ फड यांची कौटुंबिक पार्श्वभूमी सुरुवातीच्या काळात अत्यंत संघर्षाची होती. उमेदीच्या काळात त्यांनी परळी शहरात काहीकाळ ऑटो चालवलेला आहे. मात्र जिद्द, चिकाटी आणि संघर्ष करून त्यांनी उद्योग क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली. सर्वसामान्य जनतेशी त्यांची नाळ कायम जोडलेली आहे. लोकांच्या अडचणीच्या काळात धाऊन जाणारा हक्काचा माणूस अशी त्यांची सर्वत्र प्रतिमा आहे. त्यामुळे त्यांनी या विधानसभा निवडणुकीतून माघार न घेता सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी निवडणूक लढवावी असा आग्रह धरला जात असल्याने हा ऑटोचालक यंदा आमदार होणारच असा जनतेतून विश्वास व्यक्त केला जात आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

चंद्रकांत लव्हाळे

जिल्हाध्यक्ष, माळी महासंघ, हिंगोली

माजी नगरसेवक, हिंगोली



सर्व जनतेस दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

मुनीर पठाण

ग्रामपंचायत पुरस्कृत समाजसेवक, आडगाव



सर्व जनतेस दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

दि.शेगांव श्री.अग्रसेन सहकारी पतसंस्था मर्या.शेगांव

रजि नं. (१०४) कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य

* कार्यकारी मंडळ शाखा, हिंगोली. *

* श्री.रमेशचंद्र सावरमलजी बगडीया :- शाखाअध्यक्ष
* श्री. गोपाल शंकररावलजी अग्रवाल :- सदस्य
* श्री. डॉ.बनवारीलाल माधवप्रसाद बगडीया :- सदस्य
* श्री. रामचंद्र बलभद्रजी कयाल :- सदस्य
* श्री. ओमप्रकाश मोतीलालजी अग्रवालः- सदस्य
* श्री. सुनिलकुमार रमेशचंद्र बगडीयाः- सदस्य
* श्री. ओमप्रकाश बंसीलालजी खंडेलवाल :- सदस्य
* श्री. गोपाल बालकिशन अग्रवाल :- सदस्य
* श्री. आनंदा नामदेवराव बोरसे :- शाखाअधिकारी

श्री.रमेशचंद्र सावरमलजी बगडीया

अध्यक्ष

* ठेवींवर आकर्षक व्याजदर *

३० दिवसांपासून ते ३६४ ६%, १ वर्षापेक्षा जास्त – ६.५० %, बचत ठेवीवरील व्याज दर – ४ %, ज्येष्ठ नागरिक, अपंग, विधुर, विधवा, सार्वजनिक नोंदणीकृत संस्था, प्रचलित व्याजदरापेक्षा ०.५ पेक्षा जास्त व्याजदर, आठवडा– बंदी, पगार स्थगिती आणि इतर कर्ज व्याज दर १३% वाहन तारण आणि गृह बांधकाम कर्ज व्याज दर ११% सुरक्षित कर्ज मर्यादा १२% वेअरहाऊस कर्ज ९.५% सोने तारण कर्ज ९% लाभांश १२ % च्या सदस्यांना देण्यात आला आहे.



सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

शुभ दीपावली

शैलेश जयस्वाल

सरपंच, बळसोंड

ताराबाई चव्हाण

उपसरपंच, बळसोंड

श्री. केंद्रे

ग्रामपंचायत अधिकारी



सर्व जनतेस दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

भिजव सारा गाव (काव्य संग्रह)

घे भरारी (स्त्रीयांना प्रेरणादायी)

मानवतेचे पाईक (वैचारिक पुस्तक)

व्यसनाशी दोन हात (वैचारिक पुस्तक)

–: शुभेच्छुक :–

सिंधुताई दहीफळे

जिल्हाध्यक्ष, अक्षरोदय साहित्य मंडळ हिंगोली.



शुभ दिपावली निमीत्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा...

मा.श्री.राम कयाल

शुभेच्छूक

कयाल कन्स्ट्रक्शन

हिंगोली

मा.श्री.मयुर कयाल

शासकीय कंत्राटदार



सर्व जनतेस दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

तोष्णीवाल हॉस्पिटल

उर्मिल, शास्त्रीनगर, हिंगोली मो. ८७६७९२८७२३

डॉ. अनुप तोष्णीवाल

एम.बी.बी.एस., एम.डी.
डी.एम. (मेडिकल ऑन्कॉलॉजी)
टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई
कॅन्सर तज्ञ

डॉ.श्रुती तोष्णीवाल

एम.बी.बी.एस.एम.डी.
डी.एम. (हेमॅटॉलॉजिस्ट)
के.ई.एम.हॉस्पिटल, मुंबई
रक्त विकार विशेषज्ञ, औरंगाबाद

डॉ. एम.एन. तोष्णीवाल

एम.बी.बी.एस., डी.सी.एच.
बालरोग तज्ञ

डॉ.सौ. उमा तोष्णीवाल

डी.एच.एम.एस.
होमिओपॅथीक तज्ञ

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

























दिपावली निमीत्त सर्व शेतकरी, ऊस उत्पादक सभासद, ऊस पुरवठादार व अहमदपुर, चाकुर, लोहा,कंधार, उदगीर, जळकोट, पालम व गंगाखेड तालुक्यातील जनतेस
आमच्या सिध्दी शुगर कारखान्या तर्फे हार्दीक शुभेच्छा.



(2024)

हार्दीक शुभेच्छा.



:: शुभेच्छुक ::

चेअरमन, संचालक मंडळ, व्हाईस प्रेसिडेंट
व सर्व अधिकारी तसेच कर्मचारी वर्ग.

कारखान्याची ठळक वैशिष्ठे :-

१.) कारखान्याची गाळप क्षमता ४००० टी.सी.डी./प्रतिदिन.
२) ६० के. एल.पी.डी. आसवणी प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आला आहे.
३) शुभ्र व दाणेदार साखर उत्पादन.
४) अल्पदरात ऊस रोपे पुरवठा, ऊस विकासासाठी विशेष मार्गदर्शन, दर्जेदार बेणेचा पुरवठा, ठिबक सिंचन योजना, पुर्वहंगामी ऊस लागवड योजना.
५) कारखान्यास वसंतदादा शुगर इन्स्टीटयुट मार्फत द्वितीय तांत्रीक कार्यक्षमता पुरस्कार (उत्तर-पुर्व विभागातुन) दिनांक १०.३.२०१५ रोजी मिळाला.
६) कारखान्यास भारतीय शुगर या मासीका तर्फे सर्वोत्तम पुर्नेरचना पुरस्कार (देशपातळीवरचा) दि.०८.०७.२०१६ रोजी मिळाला.







